म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
सं. क्र. २६९१

REFBK-0026287
REFBK-0026287

संपादक

मोरेश्वर पटवर्धन

वामन देशपांडे

माधवी गंगापूरकर

विद्या केसकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य

बोधिनी

संदर्भ
काव्य

२६७८
२६२८७
८।२।७९

...ालय ठाणे
२६७८
२६२८७
काव्य ८।२।७९
...ग्रंथ ...

# गाणी ! मनातली; गळ्यातली ! !

भाग १

REFBK-0026287
REFBK-0026287

गाणी! मनातली; गळ्यातली!!

भाग १

पहिली आवृत्ती : ऑक्टोबर, १९९०

मूल्य : पन्नास रुपये

© साहित्य प्रसार केन्द्र मुंबई चार

१९९० साहित्य प्रसार केन्द्र, प्रकाशन क्र. ३६

पुनर्मुद्रणाचे हक्क : साहित्य प्रसार केन्द्र मुंबई चार

कवितांचे सर्वाधिकार कवींच्या अगर त्यांच्या
वारसांच्या वा प्रकाशकांच्या स्वाधीन

मुखपृष्ठ : वामन देशपांडे

मांडणी : वसंत राऊत

मुद्रक/प्रकाशक :

मोरेश्वर श्रीधर पटवर्धन, साहित्य प्रसार केन्द्र

९, डॉ. देशमुख लेन, वि. पटेल रोड

गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

मुद्रण स्थळ :

नॅशनल टाईप सेटिंग

३२, पारेख स्ट्रीट

गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

## ॥ हे हात असे जुळलेले ॥

१९८७ च्या नोव्हेंबरात 'कविताश्री' या केवळ कवितेला वाहिलेल्या मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध करताना अनेक कल्पना मनात होत्या. 'गाणी! मनातली, गळ्यातली ! ! ' या पुस्तकाची कल्पना ही त्यातलीच एक. अनेक अंगांनी मी या कल्पनेचा विचार करत होतो. वर्षभर 'कविताश्री' नियमित चालवल्यानंतर ही योजना रसिकांपुढे मांडायची असे ठरवले. मध्यंतरी 'आठवणीतल्या कविता' या पुस्तकाची योजना श्री. दिनकर बरवे आणि त्यांचे सहकारी यांनी हाती घेतल्याचे समजल्यामुळे एकमेकांच्या जवळ जाणाऱ्या या योजना एकदम मराठी रसिकांपुढे आल्या तर ते एकमेकांनां त्रासदायक तर होणार नाही ना, असे वाटल्याने त्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ निश्चित झाल्यानंतर ही योजना मी 'कविताश्री'तून मांडली. ही योजना श्री. वामन देशपांडे, सौ. माधवी गंगापूरकर आणि सौ. विद्या केसकर या स्नेहीमंडळींपुढेही मांडली, त्यांना ही कल्पना खूप आवडली. एखादी कल्पना आवडली की त्यासाठी, आर्थिक लाभ नसताही, भरभरून मदत करायची या त्यांच्या स्वभावानुसार संपादनात त्यांचा महत्त्वाचा सहभाग लाभला.

'कविताश्री'तून योजना मांडल्यावर काही वर्गणीदारांनी आपल्या आवडीची गाणी कळवायला आणि प्रकाशनपूर्व सवलतीत नोंदणी करायला सुरुवातही केली. ज्या कवींची गाणी महाराष्ट्रात विशेष गाजली, गाजत आहेत अशा कवींना पत्रे पाठवायला सुरूवात केली आणि आवर्जून सांगायलाच हवे की, सर्वश्री कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर अशा अनेक मान्यवर कवींनी 'मानधन पाठवू नका, मराठी कवितेच्या प्रसारासाठी आपण करीत असलेल्या प्रयत्नांना आमची ही भेट समजा' असे कळवले. कवींकडून व दिवंगत कवींच्या वारसांकडून येणाऱ्या अनुमतीच्या प्रत्येक पत्राबरोबर, आपली ही कल्पना कवींना रुचते आहे, असे पुस्तक यायला हवे आहे हा विश्वास वाढत गेला. आपली अनुमती कळवून या योजनेत सहभागी होणाऱ्या सर्व कवींचे आणि दिवंगत कवींच्या वारसांचे आभार मानावेत तेवढे थोडेच.

लोकसत्ता, नवशक्ती, मुंबई सकाळ, सामना, महाराष्ट्र टाइम्स, नवाकाळ या साऱ्या दैनिकांनी या योजनेला आपुलकीने योग्य प्रसिद्धी दिली. श्री. प्रदीप कर्णिक यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये लिहिलेल्या लेखामुळे ही योजना रसिकांपुढे ठसठशीतपणे

मांडली गेली. अनेक रसिकांनी आवडीच्या गाण्यांच्या याद्या पाठवल्याच, पण काहींनी तर पन्नास-पन्नास गाणीच लिहून पाठवली.

या योजनेत येणाऱ्या प्रत्येक पत्राला आम्ही उत्तरे पाठवत होतो. नोंदणीसाठी येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाशी सविस्तर बोलत होतो. कारण त्या सर्वांचा सहभाग पुस्तकाच्या सिद्धीसाठी हवा होता. अनेक रसिकांनी पत्रे पाठवून उपयुक्त सूचना केल्या. 'गाणी! मनातली, गळ्यातली!!' हे नाव व संकल्पना अनेकांना भावली. एका रसिकमित्राने लिहिलेल्या पत्रात 'आपण हे पुस्तक चांगल्या प्रकारे सिद्ध करू या' असे वाक्य आहे 'आपण' या त्यांच्या शब्दातला 'सहभाग' मनाला आनंद देणाराच होता. श्री. दिनकर बरवे यांनी 'आठवणीतल्या कविता' या पुस्तकासाठी अत्यंत प्रयत्नपूर्वक नोंदणी केली होती. त्यांनी त्या सर्व ग्राहकांचे पत्ते उपलब्ध करून देऊन, आपुलकीने पूर्ण सहकार्य केले. 'गाणी! मनातली, गळ्यातली!!' या पुस्तकाची माहितीपत्रके पाठवून संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. 'आठवणीतल्या कविता' या पुस्तकामुळे अशा प्रकारच्या पुस्तकासाठी ग्राहकांची मनोभूमिका तयार झाली होती. आमच्या योजनेत नोंदणी केलेल्या ग्राहकांत पन्नास टक्के ग्राहक 'आठवणीतल्या कविता' च्या ग्राहकांपैकी आहेत. श्री. दिनकर बरवे आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांचा उपयोग आम्हाला झाला हे मान्य करायलाच हवे.

पुस्तकाचे स्वरूप कसे असावे याबद्दल अनेकांना भेटून चर्चा केली. त्यांमध्ये पंचाहत्तरी ओलांडलेले रसिक आहेत, तरुण-तरुणीही आहेत. त्यांची आवड, कल्पना आणि सूचना यांची नोंद घेत माझी गाण्यांची यादी मी दुरुस्त करीत होतो, वाढवीत होतो, अनेक संगीतकार, गायक, कवी, रसिक जाणकार यांच्याशी झालेली चर्चा आणि पत्रव्यवहार याबाबतीत उपयुक्त ठरला. (या सर्व मंडळींचा नामनिर्देश पुस्तकात इतरत्र आला आहे.)

श्री. जी. एन्. जोशी यांना भेटण्याची सूचना श्री. यशवंत देव यांनी पहिल्याच भेटीत केली. श्री. जोशी यांच्याबरोबर माझ्या तीन बैठका झाल्या. ठरलेल्या वेळी ते बंगल्याच्या दर्शनी भागात येऊन उभे असत आणि मीही वेळेपूर्वी पाच मिनिटे आधी पोहोचत असे. त्यांच्या भेटींमध्ये भरपूर उपयुक्त माहिती मिळाली. त्यांनी वेळ दिला, सूचना केल्या आणि योजनेबद्दल उत्साह दाखवला त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

ज्येष्ठ प्रकाशक श्री. ग. का. रायकर यांनी 'गोड गोड भावगीते' हे भावगीतांचे

छोटे संग्रह पूर्वी काढले होते. आता फारच थोड्या मंडळींकडे ती पुस्तके उपलब्ध आहेत. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात सांभाळून ठेवलेल्या या पुस्तकांमुळे त्या काळातली रसिकांची आवडती गाणी छापील स्वरूपात मिळू शकली. श्री. ग. का. रायकर यांच्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

ध्वनिमुद्रिकांमध्ये काही वेळा गाण्यांची निवडक तीन-चार कडवी घेतलेली असतात. क्वचित काही गाण्यांत शब्दांची थोडी फिरवाफिरव केलेली असते. अशी गाणी या संग्रहात संपूर्ण देण्याची कोशीस केलेली आहे. पूर्ण गाणे व कविता रसिकांपर्यंत पोहोचावी हा हेतू या मागे आहे. काही वेळा काव्यसंग्रहात कवींनी केलेल्या मांडणीपेक्षा या पुस्तकातली गाण्यांची मांडणी वेगळी दिसेल. पण गायक, श्रोते आणि रसिक वाचक यांना गाणे लक्षात ठेवायला सोपे जावे या भूमिकेतून आम्ही गाण्यांच्या ओळींची अशी वेगळी मांडणी केलेली आहे. वरील हेतू ध्यानी घेऊन कवींनी आणि रसिकांनी या मांडणीकडे क्षमादृष्टीने पाहावे अशी विनंती आहे. या संदर्भात कवींनी आणि रसिक वाचकांनी आणखी काही सूचना केल्या तर पुढील संग्रहांच्या वेळी त्याचा जरूर विचार करू. तसेच नादाला गाण्यात फार महत्त्व असल्यामुळे गाण्यात सर्वत्र अनुस्वारप्रधान लेखनपद्धती अनुसरली आहे. या साऱ्या मुद्यांच्या चर्चेत श्री. राम पटवर्धन यांनी मोलाच्या सूचना केल्या, आवश्यक ती सर्व मदतही अत्यंत जिव्हाळ्याने केली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. ज्यांना आम्ही सल्लामसलतीसाठी विशेष त्रास दिला असे सर्वश्री शां.शं. रेगे, प्रा. रमेश तेंडुलकर, लतिका जोशी, यशवंत देव, दत्ता डावजेकर, प्रभाकर पंडित, दीपक पाटेकर, विजया जोगळेकर-धुमाळे, आशा गोंधळेकर, विसुभाऊ बापट, प्रभाकर दातार. नॅशनल फोटो टाईप सेटिंगचे श्री. मिलिंद वझे यांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

या गाण्यांच्या सान्निध्यातल्या प्रवासात आनंद होता, आहे. शंभरएक गाण्यांसाठी सुरू केलेल्या या प्रयत्नात रसिकांच्या मनातली, गळ्यातली आणखी कितीतरी गाणी हाती लागली आहेत. ती रसिकांपर्यंत पोहोचवावी असा प्रयत्न करायचे ठरवले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाबरोबर प्रत्येकी एकशेएक गाण्यांच्या आणखी चार भागांचा संकल्प सोडला आहे. रसिकांचे चांगले सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

मोरेश्वर पटवर्धन

# ॥ आनंदाचे डोही ॥

हे तर खरेच आहे की मनुष्य या जगात जन्माला येताना एकटाच येतो आणि जाताना एकटाच जातो. या दोन्ही वेळी त्याला सोबत करावी असे कुणाच्या मनात असले तरी ते शक्य होते का ? नाही. मात्र मनुष्य जगत असताना त्याला आयुष्यात अनेक गोष्टींची साथ मिळते-सोबत मिळते आणि ही साथ-सोबत कधी कधी फार मोलाची असते. अशा मोलाच्या सोबतीमुळेच माणसाचे इथले जिकिरीचे जिणे त्याला सुसह्य होत असते. अशी जी सोबत त्याला मिळते ती नेहमी केवळ माणसांचीच असते असे नव्हे, तर कुत्रे, पोपट, मांजर असे प्राणीसुद्धा फार चांगली निष्ठावान सोबत माणसाला कधीकधी देत असतात. अशीच सोबत माणसाला मिळते ती त्याच्या आवडत्या गाण्यांकडून. आवडत्या गाण्यांची नादमधुर सोबत माणसाचा एकटेपणा घालवायला फार मदत करते. या गाण्यांमुळेच एरवी रुक्ष भासणाऱ्या त्याच्या आयुष्यामध्ये गारगार हिरवळ निर्माण होते आणि त्याच्या मनाला उदंड उत्साहित करते-प्रफुल्लित करते.

नृत्य-गायन-वादन इत्यादी कलांची निर्मिती करणारा कलाकार - तो तर मोठा खराच. पण या साऱ्या कलांचा आस्वाद घेण्यानेही आपले आयुष्य समृद्ध होते याची जाण असलेला रसिक - तोही मोठाच.

तसे पाहिले तर जीवनावश्यक व्यवहार सर्वच करतात. त्यातून कोण सुटला आहे ? परंतु माणसाला नुसते पोटापुरते तांदूळ मिळून भागत नाही. त्याला फुलांचीही गरज असते. ती त्याच्या मनाची भूक आहे. ही फुले माणसाच्या मनाला नवसंजीवन देतात. नेमके तेच काम गाणीही करतात. कोणती गाणी ? – गाणी ! मनातली गळ्यातली ! !

मराठी रसिक मनाला आनंदाच्या अथांग सागरात ज्या गाण्यांनी आकंठ बुडवले आहे अशी हजारो गाणी गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षांत तयार झाली आहेत. ती गाणी अजूनही ताजी-टवटवीत आहेत. त्यांचा रंग अजूनही तसाच गडद आहे. तो जराही फिका झालेला नाही. त्या गाण्यांचे सूर कानावर आले की ऐकणारा जागच्या जागी थबकतो - आपले कान अधिक टवकारतो. आणि त्या सुरांना मनाच्या आवारात घेण्यासाठी अधीर होतो. त्या सुरांना पुन्हा एकदा मनोमन कवटाळतो आणि धन्य

होतो. ही सगळीच गाणी साधी, लक्षात ठेवायला सोपी आहेत असे नाही. काही अवघडही आहेत. परंतु तरीसुद्धा ज्याला गाणे गाता येत नाही असा सर्वसामान्य रसिकही ती गाणी आपल्या ओबडधोबड पद्धतीने स्वतःशी गुणगुणत त्यांचा आनंद लुटीत असतो. अवीट गोडीच्या सुरांचे हे ऐश्वर्य आजपर्यंत वाऱ्यावर विरत चालले होते. कालांतराने - आणखी काही वर्षांनी यांतली बरीच गाणी भूतकाळात, विस्मृतीच्या दरीत गडपही झाली असती. ती एकत्र संगृहीत करणे आवश्यक होते. ते काम करून साहित्य प्रसार केंद्राने मराठी रसिकांवर फार मोठे उपकार केले आहेत.

या कामाचे स्वरूप तसे व्यापक आहे. रसिकांचे निरनिराळे वयोगट असतात. स्थलकालपरत्वे रसिकांच्या आवडीनिवडीमध्येही फरक पडू शकतो. अशा परिस्थितीत अनेक ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या थरांतल्या रसिकांच्या गाठीभेटी घेऊनच त्यांच्या मनातली आणि गळ्यातली निद्रिस्त गाणी पुन्हा जागी करावी लागतात. आणि हे काम संपादक श्री. मोरेश्वर पटवर्धन यांनी मोठ्या चिकाटीने केले आहे. या संबंधात त्यांच्यामाझ्या अनेक बैठकी झाल्या. पहिल्या एकाच बैठकीत या असंख्य गाण्यांच्या महासागरातले कितीसे मोती हाताशी लागणार होते ? परंतु पटवर्धनांनी या कामाचा अखंड ध्यासच घेतला होता. त्यासाठी अनेकवेळा ते आमच्याकडे आले , चर्चा झाली. आमच्या गप्पांमधे कधी गाण्याच्या ओळीवरून गायकाचे नाव शोधून काढ, तर कधी कवीच्या नावावरून संगीतदिग्दर्शकाचे नाव आठवण्याचा प्रयत्न कर, असे सारखे चालले होते. शिवाय कधी प्रत्यक्ष ग्रामोफोन रेकॉर्ड (ध्वनिमुद्रिका) शोधून काढून तिच्या साहाय्याने या सर्व तपशीलवार बाबींची जमवाजमव कर; मिळालेली माहिती बरोबर आहे की नाही याची शहानिशा करून घे, यासाठी या क्षेत्रातल्या जाणकारांशी बोलणे कर, जवळच्यांना भेट, दूरच्यांना पत्र पाठव, फोन लाव (फोन बहुधा लागत नसल्याने) पुन्हा पुन्हा फोन लाव, पत्राच्या उत्तराची वाट पहा... सर्व प्रकार जीव मेटाकुटीला आणणारा. परंतु पटवर्धनांनी हे काम शिस्तीने आणि प्रेमाने केले. हाती घेतलेल्या कामावर प्रेम असल्यामुळेच त्यातला ताण त्यांना सुसह्य होत गेला. नपेक्षा हे जिकिरीचे काम पुरे करणे म्हणजे एक अवघड परीक्षाच होती.

आणि सर्वात गंमत अशी की "मनातली-गळ्यातली साधारणपणे शंभर गाणी आपण निवडूया" अशी सुरुवात केल्यावर पटवर्धनांच्या एक गोष्ट लक्षात आली की आणखी तीन चारशे गाणी तरी सहज आपल्या हाताशी लागली आहेत की

ज्यांच्यासाठी आणखी तीनचार तरी संग्रह आपल्याला काढावे लागतील. केवळ एका ग्रंथात मावेल इतका लहानसहान हा गीत-खजिना नाहीच नाही. या सुरेल कामामधे त्यांना अनेक बुजुर्गांनी, रसिकांनी, गायकांनी, कवींनी आणि संगीतकारांनी मनापासून मदत केली आहे. पटवर्धनांना या गोष्टीचा सानंद अभिमान आहे.

रसिकांनी आपल्या मर्मबंधात जपलेल्या गाण्यांचा हा पहिलावहिला संग्रह आहे. या संग्रहात सुमारे पंचेचाळीस गायकांनी गायलेली साठ कवींची शंभरएक गाणी आहेत. सुमारे तीस संगीतकारांच्या लोकप्रिय चालींचे स्वरब्रह्म इथे अवतरले आहे.

जेव्हापासून कविता स्वरांचा आधार घेऊन पुस्तकातल्या बंदिस्त दालनातून बाहेर पडली आणि गाण्यांच्या मैफिलीत तिने आपले बस्तान बसवले तेव्हापासूनच्या बऱ्याचशा गाण्यांचा समावेश या पहिल्या पुस्तकात आहे. श्री. जी. एन्. जोशी आणि श्री. गजानन वाटवे हे मराठी गीतगायन लोकप्रिय करणारे पहिलेवहिले आद्य कलाकार, असे मी मानतो. तरीही पन्नास वर्षांपूर्वी आझमबाईंनी गायलेले 'साजिरी गोजिरी फुले' हे गीत, किंवा संगीतदिग्दर्शक मास्टर कृष्णराव यांचे संगीत असलेल्या 'गोपालकृष्ण' या चित्रपटातले शांता आपटे यांनी गायलेले 'झरझर झरझर धार झरे' हे त्याकाळचे लोकप्रिय गाणे - अशा काही गाण्यांचा अंतर्भाव या पहिल्या संग्रहात व्हायला हवा होता असे मला वाटते. अर्थात् गाणी इतकी आहेत की पहिल्या संग्रहासाठी गाण्यांची निवड करताना संपादकांची तारांबळच उडाली असणार.

चांगली भावगीते लोकांना जशी गाण्याच्या मैफिलीत ऐकायला मिळाली तशी ग्रामोफोन रेकॉर्डसच्या द्वारेही ऐकायला मिळाली. मराठी गाण्यांचा प्रसार करण्यात एच.एम्.व्ही., कोलंबिया, यंग इंडिया इत्यादी ग्रामोफोन रेकॉर्ड कंपन्यांचाही फार मोठा वाटा होता आणि आहे, हे विसरून चालणार नाही. त्यांच्यामुळेच अनेक कलावंत गायक लोकांपुढे येऊ शकले, अनेक गीतकार, कवी यांना गीतलेखनाची प्रेरणा मिळाली आणि अनेक संगीतदिग्दर्शकही कलाक्षितिजावर चमकू लागले. ग्रामोफोन रेकॉर्ड कंपन्यांप्रमाणेच ऑल इंडिया रेडिओवरूनही या गाण्यांचा प्रसार खूपच झाला. मराठी भावगीते घरोघरी, अगदी स्वयंपाकघरापर्यंत पोहोचवण्याचे फार मोठे काम आकाशवाणीच्या कार्यक्रमांनी केले आहे. आकाशवाणीसाठी पूर्वी रसिकांचा कान आसुसलेला होता, परंतु दूरदर्शनच्या आगमनानंतर त्या परिस्थितीत एकदम फरक पडला आणि गेली वीसपंचवीस वर्षे तर रसिकांनी रेडिओकडे जणू पूर्ण दुर्लक्ष केले आणि दूरदर्शनला जवळ केले. दूरदर्शनमुळे गाणे 'ऐकणे' कमी होते. आपण

दूरदर्शनच्या पडद्यावर गाणी 'पाहायला' शिकलो. पाहणे आणि ऐकणे या दोन क्रियांमधे आपली शक्ती विभागली जाऊन गाण्याच्या श्रवणावरचे आपले लक्ष कमी झाले. शिवाय दूरदर्शन हे 'प्रेक्षणीय' कार्यक्रम 'दाखवण्या'साठीचेच माध्यम आहे, तेथे संगीत कार्यक्रमांना– केवळ संगीत कार्यक्रमांना–एकूण दुय्यम स्थानच मिळणार हे उघड आहे. माझ्या मते त्यामुळे मराठी गाण्यांचा प्रसार, ती गाणी पुनः पुनः वारंवार कानावर पडणे हे सगळे अशक्यप्राय होऊन बसले आहे. आणि परिणामतः रसिकांची मराठी गाण्यांशी गाठभेट होणे दुरापास्त घेऊन बसले आहे.

आजची एकूणच परिस्थिती मराठी गाण्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने फारशी हितावह नाही. रोज नवीन गीतलेखन करणारे थांबले आहेत असे मुळीच नाही. त्या गीतांना उत्तमोत्तम चाली देणारेही उत्साहाने काम करीत आहेत. भावगीते गाणारेही पुष्कळ निर्माण होत आहेत आणि चांगल्या प्रकारे गात आहेत. नवीन शास्त्रीय संशोधनामुळे गीतांच्या ध्वनिमुद्रणाचा दर्जा खूपच सुधारला आहे. परंतु ही नवनवीन गाणी रसिकांपर्यंत नीट पोहोचतच नाहीत, ही परिस्थिती मनाचा फार कोंडमारा करणारी आहे. म्हणूनच निदान आपल्याजवळ असलेले, वर्षानुवर्ष जोपासलेले हे गाण्यांचे धन तरी नीट सुरक्षित ठेवायला हवे. त्या दृष्टीने साहित्य प्रसार केंद्राच्या या प्रकाशनाला एक वेगळेच महत्व आहे.

या पहिल्या संग्रहात अगदी अलीकडच्या काही लोकप्रिय गाण्यांचाही अंतर्भाव झाला आहे. ही गाणी काळाच्या ओघात टिकतील की विरून जातील, काही सांगता येत नाही. पण ह्या गाण्यांच्या चाली फारच आकर्षक असल्यामुळे आजकाळच्या पिढीला ती गाणी एकदम पसंत पडली आहेत. त्यांत वापरण्यात आलेला वाद्यवृंदही मनोवेधक असल्याने त्या गीतांची एकंदर सजावट फारच उत्तम झाली आहे. त्यातल्या गायकांनीही शब्दांना आणि भावनांना योग्य तो न्याय दिला आहे. तरीही पन्नास वर्षांपासून आजपर्यंत लोकप्रियता टिकवून राहिलेली गाणी आणि त्यांच्याच पंगतीला गेल्या पाच वर्षांत लोकप्रिय ठरलेली गाणी मांडून ठेवणे हे रसिकांना कितपत रुचेल याबद्दल माझ्या मनात जरा शंका आहे. अर्थात पुरातन मातीतून उत्खनन करून काढलेले एखादे रुप्याचें भांडे आणि चारसहा महिन्यांपूर्वी अंगणात सापडलेली सोन्याची मौल्यवान आंगठी या दोहोंत अधिक मूल्य कुणाचे हे ज्याचे त्याने ठरवायचे. एक गोष्ट मात्र खरी की या संग्रहातली गाणी जुनी असोत की नवीन

असोत, त्या सर्वांची मोहिनी महाराष्ट्रातल्या रसिकांवर त्या त्या काळी जबरदस्त पडली – म्हणूनच या पहिल्या संग्रहाचे रसिक मनापासून स्वागत करतील याची मला खात्री वाटते.

**यशवंत देव**

## ॥ भारलेल्या या सुरांनी भारलेला जन्म हा ॥

माणूस नेहमी कुठल्यातरी हव्याहव्याशा वाटणाऱ्या आठवणींच्या झुल्यावर झोके घेत असतो. कुठेतरी आणि कुठूनतरी दूरवरून येणाऱ्या सुरेख आठवणी त्याला समाधानी आयुष्य जगण्याचे संजीवक क्षण सतत देत असतात. अन् मनात सतत पिंगा घालणाऱ्या ह्या अपूप क्षणांचा वळेसर म्हणजे कधीकधी भोगलेला सभोवतालचा सुंदर निसर्ग असतो. संध्याकाळी पश्चिम क्षितिजावर लालीलाल होत मावळणारा आणि त्याच वेळेला मन व्याकूळ करणारा सूर्यास्त असतो. आपल्या अत्यंत आवडत्या व्यक्तीचा, जिच्यावर आपण निहायत प्रेम करत असतो, सुखद सहवास असतो, उभे आयुष्य बेभान करणाऱ्या कवितांच्या कित्येक ओळी असतात. स्मृतींची पाने चाळताना होणारा विलक्षण नाद हा तर अनाहत नादासारखा असतो, दूरवरून संथ लयींत ऐकू येणाऱ्या देवळातल्या घंटानादासारखा असतो, संपूर्ण शरीर काबीज करणाऱ्या धबधब्याच्या – लयदार तरीही घनगंभीर – आवाजासारखा असतो. त्या सर्व आठवणींना आदी आहे, मध्य आहे, पण अंत नाही. भूतकाळातल्या सगळ्या सुरेख आठवणींवर झुलण्याचे चिरंतन वेड घेऊनच खूप वेळा माणसे नकोसा झालेला वर्तमान आनंदाने जगत असतात. भविष्यातल्या स्वप्नांपेक्षा भूतकाळातील स्वप्निल आठवणी त्यामुळेच वेड लावणाऱ्या वाटतात. त्या आठवणी हजार वाटांनी येऊन मिळतात. त्या आठवणी कुठल्या काठावरून उगमापर्यंत येतात हे एक अनाकलनीय कोडेच वाटते. पण ह्या उगमापाशी रेंगाळावेसे वाटावे असे हे मानवी मनाचे धागे तिथेच पुन्हा पुन्हा विणले जातात आणि रेशीमवस्त्र होऊन अंगभर वीज खेळवतात.

शाळेच्या वाटेवर भेटलेल्या आणि मनात कायमसाठी वसतीला आलेल्या 'आठवणीतल्या कवितां'नी जसे कविताप्रेमी रसिक वाचकांना अगदी अलीकडे

जबरदस्त पछाडले, अगदी तसेच नव्हे तर त्याहून कितीतरी जास्त मराठी गाण्यांनी, मराठी भावगीतांनी कित्येक दशके मराठी रसिकमनावर राज्य केले आहे. रक्तातल्या लाल आणि पांढऱ्या पेशींप्रमाणे या आवडत्या गाण्यांच्या अनाकलनीय रंगीत पेशींनी रक्ताचा ताबा घेतला आहे. कधीकधी असे वाटते की शेवटी आयुष्याच्या त्या सर्व कल्लोळात गाण्यांच्या ओळींनी रसिक माणसांना सावरले आहे आणि म्हणूनच 'गाणी। मनातली, गळ्यातली।।' हा ह्या सर्व काव्यात्मक भावनांचा प्रत्ययकारी आविष्कार आहे.

ह्या भावगीतस्वरूप गाण्याचा काळ नेमका केव्हा सुरू झाला, पहिले भावगीत कोणी गायले, त्याचा कवी कोण, त्याचा संगीतकार कोण होता हे जाणून घेण्याचा वा त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न इथे अजिबात केलेला नाही. मिळवता आली तेवढी माहिती आम्ही परिशिष्टात दिली आहेच, पण आमचा तो प्रमुख हेतू नाही. आकाशातल्या नेमक्या कोणत्या सोनेरी तुकड्याने मनाचा पूर्ण ताबा घेतला हे शेवटी महत्त्वाचे. कुठल्या गाण्याने मनावर पहिली फुंकर घातली नि ही गाण्यांची एल्.पी. कायमसाठी कानामनात वाजत राहिली हा ज्याच्यात्याच्या अनुभवाचा भाग आहे, पण ह्या पहिल्या खंडात निवडलेल्या गाण्यांनी रसिकांच्या ह्या पहिल्या अनुभवाला नक्कीच स्पर्श केला असेल. कुठल्या वळणावर मध्यरात्री रातराणीचा सुगंध आयुष्य उधळून गेला, कुठल्या वाटेवर आपल्यासाठी कुणीतरी फुले वेचून ठेवली, कुठल्या कोवळ्या स्पर्शाने पहिल्यांदा जागे केले हे भान विलक्षणच असते. गाण्यांच्या ओळी ह्या आठवणींसारख्या सदा सतेज राहतात. वर्तमानकाळातही जीवनात घडणाऱ्या हळुवार घटनांचा प्रत्यय काही गाणी उत्कटतेने आणून देतात. प्रणयभावनेचा वास्तवात आस्वाद घेणाऱ्या तरुणतरुणींना एकादे जुने गाणेही ऐकताना वर्तमानातला सुखद-दुःखद अनुभव अधिक उत्कटतेने जाणवू शकतो, तो अनुभव अधिक गडद होऊ शकतो. हे सारे ह्या पहिल्या खंडावरून जाणवल्याशिवाय राहणार नाही.

जी.एन्. जोशी, गजाननराव वाटवे, जे.एल्. रानडे, माणिक वर्मा, मालती पांडे ह्यांच्यासारख्या अनेक पूर्वसूरींनी अलिबाबाच्या गाण्यांच्या गुहेत प्रथम नेले अन् अक्षरशः वेडे केले. हजारो श्रोते त्यांची गाणी मंत्रमुग्ध होऊन रात्र रात्र ऐकायचे, हा

काळ फार जुना नाही. चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीचा हा वैभवशाली काळ. जेव्हा आजच्यासारखे मायावी वैभवाचे मंडप तेव्हा रस्त्यारस्त्यावर आणि घराघरात उभे नव्हते, तेव्हा या गायक-गायिकांच्या सुरांचे चांदणे सर्वत्र पसरलेले होते. गजाननराव वाटवे यांनी तर तरुणांना अक्षरशः खिळवून ठेवलेले होते. 'दोन ध्रुवांवर', 'वारा 'फोफावला' यांसारख्या गाण्यांनी नवा जमाना सुरू केला. त्यावेळची अशी कित्येक गाणी हा या पहिल्या खंडाचा प्राण आहे. त्यावेळी गायक आपल्या आवाजातून सर्व भावभावना पूर्णपणे प्रगट करायचे. वाद्यमेळांचा थयथयाट नव्हती, तर मुलायम आवाजाची जादू सर्वत्र भरली होती. त्यावेळी गायक, संगीतकार, कवी यांचा मेळ खूप सुरेख जुळून आला होता आणि या सर्व आनंदाला तोलून धरणारा अप्रतिम रसिक श्रोतृवंदही त्या काळी होता. कोण श्रेष्ठ होते हेच कळू नये असा तो काळ होता. ना. घ. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, पी. सावळाराम, स. अ. शुक्ल यांच्यासारखे कवी प्रतिभेच्या ऐन तारुण्यात होते. गाण्यांच्या मोहिनीअस्त्राची जादू या सर्व काळावर होती. बालगंधर्वांचा सोनेरी कालखंड संपत आला होता, आणि नव्या, हव्याहव्याशा वाटणाऱ्या मानवी भावभावनांचा नवा कारंजा या गाण्यांमुळे उसळला. एच्.एम्.व्ही.च्या तीन मिनिटांच्या तबकड्या फोनोवर वाजायच्या, आकाशवाणीवरून ही गाणी प्रसारित व्हायची. त्यातून एक भारलेले वातावरण निर्माण झाले. सर्वत्र कलाक्षेत्रात आणि लेखनक्षेत्रात चैतन्याचे वारे वाहते झाले होते.

सुधीर फडके, दशरथ पुजारी, यशवंत देव, श्रीनिवास खळे, वसंत प्रभू, वसंत पवार यांसारखी मंडळी संगीतक्षेत्रात नवी कामगिरी बजावू लागली होती– आणि मंगेश पाडगावकर नावाचा भावगीत लिहिणारा एक अप्रतिम समर्थ कवी या संगीतकारांना आणि गायकांना मिळाला. शांताबाई शेळके यांचे भावसरगमचे पहिले गाणे –'प्रीती जडली तुझ्यावरी'– रसिकांना वेड लावून गेले. 'शुक्रतारा मंद वारा', 'अशी पाखरे येती', यांसारखी गाणी मनाचा कब्जा घेऊ लागली. तांबे, बालकवी, आरती प्रभू यांच्या गाण्यांना जबरदस्त चाली लावणारे हृदयनाथ मंगेशकर आले. लता मंगेशकर, आशा भोसले यांनी तर सगळ्या महाराष्ट्राला आपल्या आवाजाने वेडच लावले. ती धुंदी अजूनही कायम आहे. सुरेश भट यांच्या गझलांनी एक नवे दालन खोलले. ग्रेस-महानोर यांच्या रचना अधिक गाजू लागल्या. सुमन कल्याणपूर, सुधीर

फडके, दशरथ पुजारी, अरुण दाते यांच्या आवाजाची मोहिनी सर्वांना वेडं लावून गेली ... अनेकं समर्थ गीतकार कवी यावेळी पुढे आले.

ही स्मरणगाथा न संपणारी आहे. या गाण्यांमधून निवडक गाणी या खंडासाठी वेगळी काढणे तसे कठीण काम होते. ज्या गाण्यांनी रसिकांना कालातीत ठेवा दिला त्यांतली काही या खंडात आहेत. काळाचा क्रम अजिबात न लावता, एखादी मैफल चढत चढत जावी तसे काहीसें या पहिल्या खंडातल्या निवडीबाबत म्हणता येईल. उत्तम आणि सर्वसमावेशक निवड करण्याचा प्रयत्न इथे रसिकांना जाणवेल. बरेच संगीतकार, कवी आणि गायक इथे भेटतील. गाण्यांच्या आवडींचा एक तोल सांभाळण्याची कोशीस केलेली आढळेल. उत्तम गाणे हाच, असला तर एकमेव निकष असे म्हणावे लागेल.

इतिहास नमूद करण्याचा वा समीक्षात्मक आढावा घेण्याचा शाब्दिक प्रयत्न करण्यापेक्षा आम्ही एवढेच म्हणू की येथे केलेल्या निवडीतून रसिकांना जे काय जाणवेल, ते आनंददायक नक्की असेल. एवढे यश मिळाले तरी आम्हाला समाधान वाटेल. इंद्रधनुष्य जेव्हा दोन्ही क्षितिजांना कवेत घेऊन वाकते तेव्हा माळरानावरून ते अप्रतिम दृश्य पाहताना जो स्वर्गीय आनंद मिळतो तो या खंडामुळे अल्पांशाने मिळाला तरी खूप समाधान वाटेल. काळाचे, स्थळाचे, इतकेच नव्हे तर स्वतःचे अस्तित्वही विसरायला लावणारे हे गाण्यांचे संदर्भ मनाला बिलगणारे आहेत. आठवणींचे मोरपीस जर मनावरून हलकेच फिरले तर या प्रयत्नात यश आले असे वाटेल.

– संपादक

# अनुक्रमणिका

ग्रंथ ... संग्रहालय ... शाखा


| | | |
|---|---|---|
| १) तुझे गीत गाण्यासाठी | मंगेश पाडगावकर | १९ |
| २) रानारानांत गेलि बाइ शीळ | ना. घ. देशपांडे | २० |
| ३) नका गडे माझ्याकडे | ग. दि. माडगूळकर | २२ |
| ४) गंगा जमुना डोळ्यात उभ्या का? | पी. सावळाराम | २३ |
| ५) गर्जा जयजयकार क्रांतिचा | कुसुमाग्रज | २४ |
| ६) आज गोकुळात रंग ख़ेळतो हरी | सुरेश भट | २६ |
| ७) उंबरठ्यावर माप ठेविलें | मनमोहन नातू | २७ |
| ८) दोन ध्रुवांवर दोघे आपण | मा. ग. पातकर | २८ |
| ९) तोच चंद्रमा नभांत | शांता ज. शेळके | ३० |
| १०) दत्तदिगंबर दैवत माझें | सुधांशु | ३२ |
| ११) शांत सागरीं कशास | संजीवनी मराठे | ३३ |
| १२) तुज स्वप्निं पाहिले रे, गोपाला | दत्ता डावजेकर | ३४ |
| १३) ती वेळ मला स्मरते अजुनी | यशवंत देव | ३५ |
| १४) मैत्रिणिनो, सांगू नका नांव घ्यायला | मनमोहन नातू | ३६ |
| १५) डोळे हे जुलमि गडे | भा. रा. तांबे | ३७ |
| १६) रुपेरी वाळूंत माडांच्या बनांत | शांताराम नांदगावकर | ३८ |
| १७) निरांजन पडले तबकांत | बाबुराव गोखले | ३९ |
| १८) बगळ्यांची माळ फुले | वा. रा. कांत | ४१ |
| १९) तू दूर दूर तेथें | मधुकर जोशी | ४२ |
| २०) सावळ्या विठ्ठला | रा. ना. पवार | ४३ |
| २१) ओटी भरा ग, ओटी भरा | मा. ग. पातकर | ४४ |
| २२) नंदाघरीं, नंदनवन फुललें | योगेश्वर अभ्यंकर | ४५ |
| २३) पंढरिनाथा झडकरि आतां | पी. सावळाराम | ४६ |
| २४) या कातरवेळीं | अनिल भारती | ४७ |
| २५) ने मजसी ने परत मातृभूमीला | वि. दा. सावरकर | ४८ |
| २६) फार नको वाकू जरी उंच बांधा | ना. घ. देशपांडे | ५१ |
| २७) असेच होते म्हणायचें तर | विंदा करंदीकर | ५२ |

| | | |
|---|---|---|
| २८) घाल घाल पिंगा वाऱ्या | कृ. ब. निकुंब | ५३ |
| २९) पाहुनी रघुनंदन सांवळा | रमेश अणावकर | ५४ |
| ३०) त्या सांवळ्या तनूचें | आत्माराम सावंत | ५५ |
| ३१) चले जाव, चले जाव | केशवकुमार | ५६ |
| ३२) सहज सख्या एकटाच | सूर्यकांत खांडेकर | ५८ |
| ३३) अजून त्या झुडुपांच्या मागें | वसंत बापट | ५९ |
| ३४) शुक्रतारा मंद वारा. | मंगेश पाडगावकर | ६० |
| ३५) निळा सावळा नाथ | गंगाधर महांबरे | ६२ |
| ३६) हरवले तें गवसलें का? | पी. सावळाराम | ६३ |
| ३७) ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती | मनमोहन नातू | ६४ |
| ३८) प्रतिमा उरी धरोनी | द. वि. केसकर | ६६ |
| ३९) उषःकाल होतां होतां | सुरेश भट | ६७ |
| ४०) उर्मिले, त्रिवार वंदन तुला | राजा मंगळवेढेकर | ६९ |
| ४१) अशीच अमुची आई असती | मधुकर जोशी | ७० |
| ४२) पाऊस कधीचा पडतो | ग्रेस | ७१ |
| ४३) जीवाच्या जिवलगा | संजीवनी मराठे | ७२ |
| ४४) केशवा, माधवा | रमेश अणावकर | ७३ |
| ४५) इथेच आणी या बांधावर | सुधांशु | ७४ |
| ४६) डाव मांडून भांडून मोडूं नको | ना. घ. देशपांडे | ७५ |
| ४७) कधीं बहर, कधिं शिशिर | मंगेश पाडगावकर | ७६ |
| ४८) बलसागर भारत होवो | सानेगुरूजी | ७७ |
| ४९) स्वप्नातल्या कळ्यांनो | म. पां. भावे | ७९ |
| ५०) परीकथेतिल राजकुमारा | वंदना विटणकर | ८० |
| ५१) मालवून टाक दीप | सुरेश भट | ८१ |
| ५२) जन पळभर म्हणतिल | भा. रा. तांबे | ८२ |
| ५३) श्रीरामाचे चरण धरावे | यशवंत देव | ८४ |
| ५४) धागा धागा अखंड विणु या | पी. सावळाराम | ८५ |
| ५५) होईल संक्रांत तेव्हां खरी | यतीश लोंढे | ८६ |
| ५६) मी काय तुला वाहूं? | कुसुमाग्रज | ८८ |
| ५७) सखि, मंद झाल्या तारका | सुधीर मोघे | ८९ |

| | | |
|---|---|---|
| ५८) उघड उघड उघड दार | अनिल | ९० |
| ५९) माझा पानमळा पानमळा | वि. म. कुलकर्णी | ९१ |
| ६०) प्रीती जडली तुझ्यावरी | शांता ज. शेळके | ९२ |
| ६१) गळ्याची शपथ तुला जिवलगा | ग. ल. ठोकळ | ९३ |
| ६२) यमुनाकाठी ताजमहाल | अनिल भारती | ९४ |
| ६३) शोधिसी मानवा, राउळीं मंदिरीं | वंदना विटणकर | ९५ |
| ६४) आला खुशीत् समिंदर | अनंत काणेकर | ९६ |
| ६५) माती सांगे कुंभाराला | मधुकर जोशी | ९८ |
| ६६) अजून नाहीं जागा राधा | इंदिरा संत | ९९ |
| ६७) तुझें बघणें | विनायक राहतेकर | १०० |
| ६८) सांग पोरी सांग सारे | मनमोहन नातू | १०१ |
| ६९) नीज माझ्या नंदलाला | मंगेश पाडगावकर | १०२ |
| ७०) आली कुठूनशी कानीं | सोपानदेव चौधरी | १०३ |
| ७१) मीलनास आपुल्या | गंगाधर दांडेकर | १०५ |
| ७२) घरांत हसरे तारे | द. वि. केसकर | १०६ |
| ७३) आठवणी दाटतात | योगेश्वर अभ्यंकर | १०७ |
| ७४) तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून | वसंत बापट | १०८ |
| ७५) जांभुळपिकल्या झाडाखालीं | ना. धों. महानोर | १०९ |
| ७६) जीवनांत ही घडी | यशवंत देव | ११० |
| ७७) पूर्वेच्या देवा | गंगाधर महांबरे | १११ |
| ७८) आषाढाच्या सघन घनासम | प्रवीण दवणे | ११२ |
| ७९) प्रेम कोणीही करीना | माधव जूलियन | ११३ |
| ८०) दिसलीस तूं... फुलले ऋतू | सुधीर मोघे | ११४ |
| ८१) गोरी गोरीपान, फुलासारखी छान | ग. दि. माडगूळकर | ११५ |
| ८२) कैवल्याचा चांदण्याला | अशोकजी परांजपे | ११६ |
| ८३) माझ्या प्रीतिच्या फुला | अनिल | ११७ |
| ८४) बहु असोत सुंदर संपन्न कीं महा | श्री. कृ. कोल्हटकर | ११९ |
| ८५) जाईन विचारित रानफुला | शांता ज. शेळके | १२१ |
| ८६) या झोपल्या जगांत | राम मोरे | १२२ |
| ८७) विसरशील खास मला | ज. के. उपाध्ये | १२३ |
| ८८) स्वरगंगेच्या काठावरतीं | शंकर वैद्य | १२४ |

| | | |
|---|---|---|
| ८९) विजयपताका श्रीरामाची | योगेश्वर अभ्यंकर | १२५ |
| ९०) माझी बेगम आली | बा. भ. बोरकर | १२६ |
| ९१) गोकुळिंचा राजा माझा | ग. दि. माडगूळकर | १२७ |
| ९२) आई, बघ ना कसा हा दादा | शांता ज. शेळके | १२८ |
| ९३) दूर आर्त सांग कुणी | मंगेश पाडगावकर | १२९ |
| ९४) वृंदावनांत माझ्या | शांताराम नांदगावकर | १३० |
| ९५) बोल सख्या मधुबोल रे | स. अ. शुक्ल | १३१ |
| ९६) डोळे तुझे बदामी | बा. भ. बोरकर | १३२ |
| ९७) ये रे घना, ये रे घना | आरती प्रभू | १३३ |
| ९८) जा सांग लक्ष्मणा | वसंत बापट | १३४ |
| ९९) प्रेमस्वरूप आई | माधव जूलियन | १३५ |
| १००) अरे संसार संसार | बहिणाबाई चौधरी | १३७ |
| १०१) माझें गाणें | बालकवि | १३९ |
| परिशिष्ट | १ | १४० |
| परिशिष्ट | २ | १४१ |
| परिशिष्ट | ३ | १४४ |

## तुझें गीत गाण्यासाठीं

मंगेश पाडगावकर

तिन्ही लोक आनंदानें भरुन गाउं दे रे
तुझें गीत गाण्यासाठीं सूर लावुं दे रे ।।धृ.।।

शुभ्र तुरे माळुन आल्या निळ्या निळ्या लाटा
रानफुलें लेवुन सजल्या या हिरव्या वाटा
या सुंदर यात्रेसाठीं मला जाउं दे रे ।।१।।

मोर केशराचे झुलती पहांटेस दारीं
झऱ्यांतुनी दिडदा दिडदा वाजती सतारी
सोहळ्यांत सौंदर्याच्या तुला पाहुं दे रे ।।२।।

शांत शांत उत्तररात्रीं मंद मंद तारे
तुझें प्रेम घेउन येती गंधधुंद वारे
चांदण्यांत आनंदाच्या मला न्हाउं दे रे ।।३।।

एक एक नक्षत्राचा दिवा लागतांना
आणि फुलें होण्यासाठीं कळ्या जागतांना
पौर्णिमा स्वरांची माझ्या तुला वाहुं दे रे ।।४।।

# रानारानांत गेलि बाइ शीळ

## ना. घ. देशपांडे

रानारानांत गेलि बाइ शीळ ॥धृ.॥

राया, तुला रे, काळयेळ नाही
राया, तुला रे, ताळमेळ नाही
   थोर राया, तुझं रे कुळशीळ ॥१॥

येड्यावानी फिरे रानोवना
जसा कांहीं ग, मोहन कान्हा
   हांसे जसा ग, राम घननीळ ॥२॥

वाहे झरा ग, झुळझुळवाणी,
तिथं वाऱ्याचि गोड गोड गाणीं
   तिथं राया तुं उभा असशील ॥ ३ ॥

तिथं रायाचे पिकले मळे,
वर आकाश शोभे निळें
   शरदाच्या ढगाचि त्याला झील ॥४॥

गेलें धावून सोडुन सुगी,
दुर राहून राहिली उगी
   शोभे रायाच्या गालावर तीळ ॥५॥

रानिं राया जसा फुलावाणी
रानिं फुलेन मी फुलराणी
   बाइ, सुवास रानिं भरतील ॥६॥

फिरुं गळ्यांत घालुन् गळा,
मग घुमव मोहन शिळा,
 रानिं कोकीळ सुर धरतील ! ॥७॥

## नका गडे माझ्याकडे

### ग. दि. माडगूळकर

नका गडे माझ्याकडे पुन्हां पुन्हां पाहूं
लाजरिच्या रोपटिला दृष्ट नका लावूं ॥धृ.॥

घोटाळते पायामाजी तुरूतुरू चाल
आडतात ओठांवरी मनातले बोल
नका बाई माझ्यामागें नदीवरी येऊं ॥१॥

पाहील ना कुणीतरी सोडा माझी वाट
मुलुखाचे द्वाड तुम्ही निलाजरे धीट
इतुक्यावरि हांसुनिया वेड नका लावूं ॥२॥

माथ्यावरी वैशाखाचें रणरणे ऊन
छंदिफंदि डोळियांचे त्यांत आगबाण
बावरल्या हरिणीची पाठ नका घेऊं ॥३॥

# गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां ?

**पी. सावळाराम**

गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां ?
  जा मुली जा, दिल्या घरीं तूं सुखी रहा ॥धृ.॥

कडकडुनी तूं मिठी मारतां बाळे,
बाळपण आलें, आलें, घुमवित घुंगुरवाळे
आठवले सारें सारें, गहिंवरले डोळे
  कढ मायेचे तुला सांगती, जा ॥१॥

दारांत उभी राहिली खिलारी जोडी
बघ दीर धाकले बसले, खोळंबुन गाडी
पूस ग डोळे या पदरानें, सावर ही साडी
  रूप दर्पणीं मला ठेवुनी जा ॥२॥

मोठ्यांची तूं सून पाटलिण मानाची
हसले तुझे ग, हिरवे, बिलवर लगिनचुडे,
बघुं नकोस मागें मागें, लाडके चल पुढें
  नकोस विसरूं परि आईला, जा ॥३॥

# नका गडे माझ्याकडे

## ग. दि. माडगूळकर

नका गडे माझ्याकडे पुन्हां पुन्हां पाहूं
लाजरिच्या रोपटिला दृष्ट नका लावूं ।।धृ.।।
घोटाळते पायामाजी तुरूतुरू चाल
आडतात ओठांवरी मनातले बोल
नका बाई माझ्यामागें नदीवरी येऊं ।।१।।

पाहील ना कुणीतरी सोडा माझी वाट
मुलुखाचे द्वाड तुम्ही निलाजरे धीट
इतुक्यावरि हांसुनिया वेड नका लावूं ।।२।।

माथ्यावरी वैशाखाचें रणरणे ऊन
छंदिफंदि डोळियांचे त्यांत आगबाण
बावरल्या हरिणीची पाठ नका घेऊं ।।३।।

# गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां ?

**पी. सावळाराम**

गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां ?
जा मुली जा, दिल्या घरीं तूं सुखी रहा ॥धृ.॥

कडकडुनी तूं मिठी मारतां बाळे,
बाळपण आलें, आलें, घुमवित घुंगुरवाळे
आठवले सारें सारें, गहिंवरले डोळे
कढ मायेचे तुला सांगती, जा ॥१॥

दारांत उभी राहिली खिलारी जोडी
बघ दीर धाकले बसले, खोळंबुन गाडी
पूस ग डोळे या पदरानें, सावर ही साडी
रूप दर्पणीं मला ठेवुनी जा ॥२॥

मोठ्यांची तूं सून पाटलिण मानाची
हसले तुझे ग, हिरवे, बिलवर लगिनचुडे,
बघुं नकोस मागें मागें, लाडके चल पुढें
नकोस विसरूं परि आईला, जा ॥३॥

# गर्जा जयजयकार क्रांतिचा

## कुसुमाग्रज

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार ।।धृ.।।

खळखळुं द्या या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत ?
सर्पांनों, उद्दाम आवळा कसूनियां पाश
पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश
तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार ?
कधीही तारांचा संभार ? ।।१।।

क्रुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल थैमान
कुरतडुं द्या आतडीं करूं द्या रक्ताचें पान
संहारक काली, तुज देती बळीच आव्हान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही, आम्हाला कसलें कारागार ?
अहो, हें कसलें कारागार ? ।।२।।

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनियां बेहोष धावलों ध्येयपथावरतीं
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार ।।३।।

श्वासांनों, जा वायूसंगें ओलांडुन भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत
सांगा "वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार ॥४॥

नाचवितां ध्वज तुझा गुंतले शृंखलेंत हात
तुझ्या यशाचे पवाड गातां गळ्यांत ये तात
चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवनअर्घ्य तुजला ठरलो वेडे पीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार
आई, वेड्यांना आधार ! ॥५॥

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रींच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतात प्रेतें
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई, खळखळा तुटणार ॥६॥

आतां कर ओंकारा तांडव गिळावया घांस
नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यांवरी फांस
रक्तमांस लुटण्यास गिधाडें येउं देत क्रूर
पहा मोकळें केलें आतां त्यासाठीं ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या, सुखेनैव संहार
मरणा, सुखेनैव संहार ॥७॥

# आज गोकुळांत रंग खेळतो हरी

## सुरेश भट

आज गोकुळांत रंग खेळतो हरी,
राधिके, जरा जपून जा तुझ्या घरीं! ॥धृ.॥

तो चटोर चित्तचोर वाट रोखतो
हात ओढुनी खुशाल रंग टाकतो
रंगवून रंगुनी गुलाल फांसतो...
सांगतें अजूनही तुला परोपरी ! ॥१॥

सांग श्यामसुंदरास काय जाहलें ?
रंग टाकल्याविना कुणा न सोडलें,
ज्यास त्यास रंग रंग रंग लागले !
एकटीच वांचशील काय तूं तरी ? ॥२॥

त्या तिथें अनंगरंगरास रंगला
गोपगोपिकांसवें मुकुंद दंगला
तो पहा मृदुंग मंजिऱ्यांत वाजला
हाय वाजली फिरून तीच बांसरी ! ॥३॥

## उंबरठ्यावर माप ठेविलें

### मनमोहन नातू

उंबरठ्यावर माप ठेविलें
मी पायानें उलथुनि आल्यें
आल्यें तुझिया घरीं
कराया तुझीच रे चाकरी ॥धृ.॥

माहेराची माया तोडुनि
इकडे आल्यें सख्या, धावुनी
वृत्ति होइ बावरी ॥१॥

फुलासारखी घरीं वाढल्यें
आईनें ओंजळींत धरिलें
अश्रू येतां दुरी ॥२॥

तुझे चरणरज लाविन भाळीं
तुझीच गाइन मी भूपाळी
हात तुझे गळसरी ॥३॥

## दोन ध्रुवांवर दोघें आपण

**मा. ग. पातकर**

दोन ध्रुवांवर दोघें आपण
तूं तिकडे अन् मी इकडे
वाऱ्यावरती जशीं चुकावीं
दोन पाखरें दोहिंकडे ॥धृ.॥

दिवस मनाला वैरि भासतो
तारा मोजित रात गुजरितों
युगसम वाटे घडीघडी ही
कालगती का बंद पडे? ॥१॥

वसंतासवें धरा नाचते
तांडव भीषण मज तें गमतें
गजबजलेल्या जगांत जगतों
जीवन एकलकोंडें ॥२॥

निःश्वसितें तव सांगायाला
पश्चिमवारा बिलगे मजला
शीतल कोमल तुझ्या करांचा
सर्वांगीं जणुं स्पर्श घडे ॥३॥

स्मृति-पंखांनीं भिरभिर फिरतें
प्रीतपाखरू तुझ्याच भंवते
मुक्या मनाचें दुःख सागरा
सांग गर्जुनी तूं तिकडे ॥४॥

तोच असें मी, घर हें तेंही
तोच सखी, संसार असेही
तुझ्यावांचुनी शून्य पसारा
प्राण तिथें अन देह इथें ॥५॥

## तोच चंद्रमा नभांत

### शांता ज. शेळके

तोच चंद्रमा नभांत
तीच चैत्रयामिनी
एकांतीं मजसमीप
तीच तूंहि कामिनी ।।धृ.।।

नीरवता ती तशीच
धुंद तेंच चांदणें
छायांनीं रेखियलें
चित्र तेंच देखणें
जाईचा कुंज तोच
तीच गंधमोहिनी ।।१।।

सारें जरि तें तसेंच
धुंदि आज ती कुठें ?
मीहि तोच तीच तूंहि
प्रीति आज ती कुठें ?
ती न आर्तता उरांत
स्वप्न तें न लोचनीं ।।२।।

त्या पहिल्या प्रीतीच्या
आज लोपल्या खुणा
वाळल्या फुलांत व्यर्थ
गंध शोधतों पुन्हा
गीत ये न तें जुळून
भंगल्या सुरांतुनी ॥३॥

## दत्तदिगंबर दैवत माझें

### सुधांशु

दत्तदिगंबर दैवत माझें
हृदयीं माझ्या नित्य विराजे ! ॥धृ.॥

अनसूयेचें सत्त्व आगळें
तीन्ही देवहि झालीं बाळें
त्रैमूर्ती अवतार मनोहर
दीनोद्धारक त्रिभुवनिं गाजे ॥१॥

तीन शिरें, कर सहा शोभती
हास्य मधुर शुभ वदनावरती
जटाजूट शिरिं, पायिं खडावा,
भस्मविलेपित कांती साजे ॥२॥

पाहुनि प्रेमळ सुंदर मूर्ती
आनंदाचे आसूं झरती
सारे सात्त्विक भाव उमलती,
हळुहळु सरतें मीपण माझें ॥३॥

## शांत सागरीं कशास

### संजीवनी मराठे

शांत सागरीं कशास
उठविलींस वादळें
गायिलें तुवां कशास
गीत मन्मनांतलें ॥धृ.॥

काय हें तुझ्यामुळें
देहभान हरपलें
युगसमान भासतात
आज नाचरी पळें ॥१॥

अमृतमधुर बोल एक
श्रवणिं जों न पाडिलास
अधिरता भरे जिवांत
केवढी तयामुळें ॥२॥

स्वर्ग कल्पनेंतला
येइल कधिं भूतला,
दिवसरात्र अंतरांत
आस ही उचंबळे ॥३॥

## तुज स्वप्निं पाहिलें रे, गोपाला

### दत्ता डावजेकर

तुज स्वप्निं पाहिलें रे, गोपाला
जमल्या ललना चतुरा
मोदें स्वागत करण्याला... ।।धृ.।।

आळविती कुणी सुरस रागिणी
कोमल मंजुळ वाणी
तव श्रांत वदन शमवाया
नंदकिशोरा सुखवाया
झुळु झुळु वायुहि आला ।।१।।

थांबति विहगहि नभिं या
पसरुनि शीतल छाया
दिपतिल नयन तुझे रे म्हणुनी
रविवरि मेघमालिका जमुनी
अंजिरि पडदा महिवरिं धरला ।।२।।

# ती वेळ मला स्मरते अजुनी

## यशवंत देव

ती वेळ मला स्मरते अजुनी
दो हृदयांच्या तारा केव्हां
सुरांमधें आल्या जुळुनी ! ॥धृ.॥

खूण उमटली दो नयनांतुन
बंधन जडलें स्पर्शावांचुन
आतुरलें जरि तुला पहाया
लाजेनें गेलें चुरुनी ! ॥१॥

कुणी म्हणालें 'प्रेमभावना'
वदलें कुणिसें 'विषयवासना'
मज वेडीला एकच कळलें
मी-तूंपण गेलें विरुनी ! ॥२॥

पुनर्भेट या नसुं दे भाळीं
विधी लिहूं दे विरह कपाळीं
अमृतवेळा पहिलीवहिली
कोरियली मी चिरंतनीं ! ॥३॥

# मैत्रिणिंनों, सांगूं नका नांव घ्यायला

मनमोहन नातू

मैत्रिणिंनों, सांगूं नका नांव घ्यायला ।।धृ.।।

नका विचारूं स्वारि कशी ?
दिसे कशी, अन् हांसे कशी ?
कसं पाडलं मला फर्शी ?
कशी जाहलें राजिखुशी ?
नजीक येतां मुहूर्तवेळा ।।१।।

नका विचारूं गमतीजमती
काय बोललों पहिल्या भेटीं ?
कसें रंगलें स्वप्न पहाटीं ?
कशी रंगली लाली ओठीं ?
कसा जाहला जीव खुळा ? ।।२।।

अर्थ उलगडे समरसतेचा
सुटे उखाणा संसाराचा
छंद लागला मजला त्यांचा
धुंद बने बुल्बूल जिवाचा
घरीं यायची झाली वेळा ।।३।।

## डोळे हे जुलमि गडे

भा. रा. तांबे

डोळे हे जुलमि गडे
   रोखुनि मज पाहुं नका
जादुगिरी त्यांत पुरी
   येथ उभे राहुं नका ॥ धृ.॥

घालुं कशी कशिदा मी?
   होति किती सांगु चुका !
बोचे सुइ फिरफिरुनी
   वेळ सख्या, जाय फुका. ॥१॥

खळबळ किति होय मनीं !
   हसतिल मज सर्वजणी.
येतिल त्या संधि बघुनि
   आग उगा लावुं नका ! ॥२॥

# रुपेरी वाळूंत माडांच्या बनांत

**शांताराम नांदगावकर**

रुपेरी वाळूंत माडांच्या बनांत ये ना
बनांत ये ना, जवळ घे ना
चंदेरी चाहूल लावीत प्रीतींत ये ना
प्रीतींत ये ना, जवळ घे ना ।। धृ.।।

बेधुंद आज आसमंत सारा
कुंजांत गात मंद धुंद वारा
दाटे उरीं प्रिया तुझा इशारा
देहावरी फुले असा शहारा
तुझा इशारा... असा शहारा ।।१।।

लाजेंत आज हीं फुलें नहाती
गालीं अनार प्रीतगीत गाती
तूं ये निशा अशी करी पुकारा
दे ये प्रिया मला तुझा निवारा
तुझा निवारा... तुझा निवारा ।।२।।

## निरांजन पडलें तबकांत

### बाबुराव गोखले

निरांजन पडलें तबकांत
बाळ तव गेला समरांत ॥ धृ.॥

क्षणाआधिं तर तेवत होती
पूजेमधली प्रशांत ज्योती
दृष्ट कुणाची लागुन का ती
विझली निमिषांत ॥१॥

ओवाळुनही झाली नव्हती
तोंच उधळली मंगल आरति
कां पडली बाळाची आहुति
संगर-यज्ञांत ॥२॥

रागरागिणी अळवुन झाली
आयुष्याची कविता संपलि
दुर्दैवानें माता बसली
भैरवि अळवीत ॥३॥

परक्यांना करण्यास्तव तर्पण
फूल पोटिंचें केलें अर्पण
निर्माल्याला तुडवुं नका पण
सोडा गंगेंत ॥४॥

आतां मज द्या शव आणूनी
झांकिन तें मी ऊर फाडुनी
भडाग्नि शोकानलें देउनी
निजेन सरणांत ॥५॥

# बगळ्यांची माळ फुले

## वा. रा. कांत

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत :
भेट आपुली स्मरशी काय तूं मनांत ? ।। धृ.।।

छेडिति पानांत बीन थेंब पावसाचे,
ओल्या रानांत खुले ऊन अभ्रकाचें,
मनकवडा घन घुमतो दूर डोंगरांत
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत ॥१॥

त्या गांठी, त्या गोष्टी नारळिच्या खालीं ,
पौर्णिमाच तव नयनीं भर दिवसा झाली !
रिमझिमतें अमृत तें कुठुनि अंतरांत ?
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत. ॥२॥

हातांसह सोन्याची सांज गुंफतांना,
बगळ्यांचे शुभ्र कळे मिळुनि मोजतांना,
कमळापरि मिटति दिवस उमलुनी तळ्यांत,
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत. ॥३॥

तूं गेलिस तोडुनि ती माळ, सर्व धागे,
फडफडणें पंखांचें शुभ्र उरे मागें,
सलते ती तडफड का कधिं तुझ्या उरांत ?
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत. ॥४॥

# तूं दूर दूर तेथें

## मधुकर जोशी

तूं दूर दूर तेथें, हुरहूर मात्र येथें
विरहांत रात्र मोठी, प्रेमी जनांस वाटे ॥धृ.॥

शब्दांत सांगु कैसें, तें दुःख अंतरींचें
ओलावले दवांत, हे कांठ पापण्यांचे
भरला स्वरास कंप, कंपांत भाव दाटे ॥१॥

मी भाबडी मनाची, आहेंच स्वप्नवेडी
विरुनी तुझ्यांत जावें, ही आस एक वेडी
राहो अभंग प्रीती, राहो अभंग नातें ॥२॥

भाळावरी असे हें, सौभाग्य लाल कुंकूं
विक्राळ काळ येतां, दोघें तयास जिंकूं
फुलतां मनांत आशा, ओठांत गीत येतें ॥३॥

# सांवळ्या विठ्ठला

रा. ना. पवार

सांवळ्या विठ्ठला, तुझ्या दारि आलें
विसरूनी गेलें, देहभान ॥१॥

गोजिरें हें रूप, पाहुनियां डोळां
दाटला उमाळा, अंतरिं माझ्या ॥२॥

तुकयाचा भाव, पाहुनी निःसंग
तारिले अभंग, तूंच देवा ॥३॥

जगीं कितीकांना, तारिलेंस देवा
स्वीकारीं ही सेवा, आतां माझी ॥४॥

कृपाकटाक्षाचें, पाजवीं अमृत
ठेव शिरीं हात, पांडुरंगा ॥५॥

# ओटी भरा ग, ओटी भरा

**मा. ग. पातकर**

ओटी भरा ग, ओटी भरा
माझि ओटी भरा
जाणार आज मी माहेराला
माझ्या माहेराला ॥ धृ.॥

हिरवि चोळी शालु हिरवा
हातीं भरला हिरवा चुडा
हिरवा मरवा वेणींत घाला
माझ्या वेणींत घाला ॥१॥

हिरव्या वेली, हिरव्या रानीं
मध्यें मी बसलें हिरवी राणी
हिरवा चौरंग बसायला
मला बसायला ॥२॥

माझीं मला जड झालिं पाउलें
डोळ्यांभवतीं काळिं वर्तुळें
आशीर्वाद तुम्ही द्या हो मला
तुम्ही द्या हो मला ॥३॥

हसूं नका ग, गुपित सांगतें
आज जरी मी एकलि जातें
आणिन संगें युवराजाला
माझ्या युवराजाला ॥४॥

## नंदाघरीं, नंदनवन फुललें

**योगेश्वर अभ्यंकर**

नंदाघरीं, नंदनवन फुललें
बोल बोबडे श्रीरंगाचे
गोकुळांत घुमले ॥ धृ.॥

रिंगण घाली श्याम सांवळा
बाळकृष्ण तो रांगत आला
हात धरूनी चालुं लागला
पुढें पुढें ग, पाउल पडलें
नंदनवन फुललें ॥१॥

हात चिमुकला उंच नाचवी
घुमघुम वाळा मधुर वाजवी
स्वतः हांसुनी जगास हंसवी
कौतुक करतें गोकुळ सगळें
नंदनवन फुललें ॥२॥

# पंढरिनाथा, झडकरि आतां

## पी. सावळाराम

पंढरिनाथा, झडकरि आतां
पंढरि सोडुन चला
विनविते रखुमाई विठ्ठला ॥ धृ.॥

ज्ञानदेवें रचिला पाया
कळस झळके वरि तुकयाचा
याच मंदिरीं आलों आपण
प्रपंच करण्या भक्तजनांचा
भक्त थोर ते गेले निघुनी
गेला महिमा तव नामाचा
विक्रय चाले देवपणाचा
रहायचें मग इथें कशाला? ॥१॥

धरणें धरुनी भेटीसाठीं
पायरीला हरिजन मेळा
भाविक भोंदू पूजक म्हणती
केवळ अमुचा देव उरला
कलंक अपुल्या महानतेला
बघवे ना हो रखुमाईला
यायचें तर लवकर बोला
ना तर द्या हो निरोप मजला ॥२॥

## या कातरवेळीं

### अनिल भारती

या कातरवेळीं,
पाहिजेस तूं जवळीं ॥ धृ.॥

एकटि मी दे अधार
छेड हळू हृदय-तार
ऐक आर्त ही पुकार
सांजवात ये उजळीं ॥१॥

रजनीची चाहुल ये
उचलुनियां अलगद घे
पैलतिरीं मजला ने
पुसट वाट पायदळीं ॥२॥

शिणलें रे, मी अधीर
भवतीं पसरे तिमीर
व्याकुळ नयनांत नीर
मिलनाची आस खुळी ॥३॥

## ने मजसी ने परत मातृभूमीला

### वि. दा. सावरकर

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला ।। धृ.।।

भूमातेच्या चरणतला तुज धूतां ।
मी नित्य पाहिला होता ।।
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं ।
सृष्टिची विविधता पाहूं ।।
तइं जननीहृद् विरहशंकितहि झालें ।
परि तुवां वचन तिज दिधलें ।।
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठि वाहीन ।
त्वरित या परत आणीन ।।
विश्वसलों या तव वचनीं । मी
जगदनुभवयोगें बनुनी । मी
तव अधिक शक्त उद्धरणीं । मी
येईन त्वरें, कथुनि सोडिलें तिजला
सागरा, प्राण तळमळला ।।१।।

शुक पंजरि वा हरिण शिरावा पाशीं ।
ही फसगत झाली तैशी ।।
भूविरह कसा सतत साहुं यापुढती ।
दशदिशा तमोमय होती ।।

गुणसुमनें मीं वेचियलीं या भावें ।
कीं तिनें सुगंधा घ्यावें ॥
जरि उद्धरणीं, व्यय न तिच्या हो साचा ।
हा व्यर्थ भार विद्येचा ॥
ती आम्रवृक्षवत्सलता । रे
नवकुसुमयुता त्या सुलता । रे
तो बाल गुलाबहि आतां । रे
फुलबाग मला, हाय पारखा झाला ।
सागरा, प्राण तळमळला ॥२॥

नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा ।
मज भरतभूमिचा तारा ॥
प्रासाद इथें भव्य परी मज भारी ॥
आइची झोपडी प्यारी ॥
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा
वनवास तिचा जरि वनिंचा
भुलविणें व्यर्थ हें आतां । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रे
तुज सरित्पते, जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितों तुजला ।
सागरा, प्राण तळमळला ॥३॥

या फेनमिषें हंससि निर्दया कैसा ।
कां वचन भंगिसी ऐसा? ॥

त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते ॥
भिउनि कां आंग्लभूमीतें ॥
मम मातेला अबल म्हणुनि फसवीसी
मज विवासनातें देशी ॥
तरि आंग्लभूमि भयभीता ॥ रे
अबला न माझि ही माता । रे
कथिल हें अगस्तिस आतां । रे
जो आचमनीं एक क्षणीं तुज प्याला ।
सागरा, प्राण तळमळला ॥४॥

## फार नको वाकूं जरी उंच बांधा

### ना. घ. देशपांडे

फार नको वाकूं जरी उंच बांधा,
फार नको झाकूं तुझा गौर खांदा. ॥१॥

दोन निळे डोळे तुझे फार फंदी,
साज तुझा आहे जुईचा सुगंधी. ॥२॥

चित्त मऊ माझें जशी रानकाळी,
धुंद तुझी आहे नदी पावसाळी. ॥३॥

श्वास तुझेमाझे जसा रानवारा
प्रीत तुझीमाझी जशी सांजतारा. ॥४॥

शाखा
काव्य

# असेंच होतें म्हणायचें तर

## विंदा करंदीकर

असेंच होतें म्हणायचें तर
अशी अचानक भ्यालिस कां ?
अर्ध्या वाटेवरती जाउन
पुन्हां परत तूं आलिस कां ? ॥१॥

असेंच होतें म्हणायचें तर
वरवर फसवें हसलिस कां ?
स्वप्नाला चुरडून मिठींतच
पुन्हा तयावर रुसलिस कां ? ॥२॥

असेंच होतें म्हणायचें तर
उगाच खोटें रडलिस कां ?
भरांत येऊन भलत्यासलत्या
करांत माझ्या शिरलिस कां ? ॥३॥

असेंच होतें म्हणायचें तर
अशी जिवाला डसलिस कां ?
केस मोकळे ओले घेउन
वणव्यामध्यें घुसलिस कां ? ॥४॥

# घाल घाल पिंगा वाऱ्या

## कृ. ब. निकुंब

घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

"सुखी आहे पोर" - सांग आईच्या कानांत
"आई, भाऊसाठीं परी मन खंतावतं !

विसरली का ग, भादव्यांत वर्स झालं,
माहेरींच्या सुखाला ग, मन आंचवलं.

फिरुन्-फिरुन् सय येई, जीव वेडावतो
चंद्रकळेचा ग, शेव, ओलाचिंब होतो.

काळ्या कपिलेची नंदा खोडकर फार,
हुंगहुंगुनियां करी किती ग, बेजार !

परसांत पारिजातकाचा सडा पडे,
कधीं फुलं वेचायला नेशील तूं गडे ?

कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावर दाट जशी तुझी, माय...!"

आले भरून् डोळे पुन्हा गळा नि दाटला
माउलीच्या भेटीसाठीं जीव व्याकूळला !

घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

# पाहुनी रघुनंदन सांवळा

रमेश अणावकर

पाहुनी रघुनंदन सांवळा
लाजली सीता स्वयंवराला ।।धृ.।।

नक्षिदार अति रम्य मंडपीं
जमली सारी थोर मंडळी
उभी जानकी जनकाजवळी
घेउनी, धवल फुलांची माळा ।।१।।

धनुष्यास त्या दोर लावण्या
शूर पुरुष तो कुणी धजेना
काय करावें कांहिं सुचेना
न्याहळी, दुरुनी श्रीरामाला ।।२।।

मुनीवरांना मान देउनी
उठले रघुविर असें पाहुनी
मनासारखें येतां जुळुनी
नाचते, हर्षभरानें मिथिला ।।३।।

## त्या सांवळ्या तनूचें

### आत्माराम सावंत

त्या सांवळ्या तनूचें
मज लागलें पिसें ग
न कळे मनास आतां
त्या आवरूं कसें ग ! ॥ धृ.॥

ये ऐकण्यास जेव्हां
त्याचा सुरेल पावा
चोहींकडे बघें मी
परि ना कुठें दिसे ग ! ॥१॥

हलतो तरू-लतांत
हा खोडसाळ वात
आलाच वाटतें 'तों'
मी सारखी फसें ग ॥२॥

खुपते तनूस शेज
क्षणही न येत नीज
डोळ्यांस तो दिसावा
हृदयांत जो वसे ग ॥३॥

## चले जाव, चले जाव

### केशवकुमार

चले जाव, चले जाव, चले जाव ॥ धृ.॥

हा सारा माझा देश
माझा प्यारा भारत देश
मी राजा या देशाचा
मालक मी या भूमीचा
माझीं शेतें, माझे डोंगर
माझी गंगा, माझे सागर
हिमालयाच्या शिखरावरुनी
सांगु जगाला साऱ्या गर्जुनि
खबरदार जर इथें याल तर
सांडतील रक्ताचे सागर ॥१॥

हिंदु-मुसलमान आम्ही भाई
भारतमाता अमुची आई
बच्चे आम्ही शूरांचे
वारस आम्ही वीरांचे
फौज आमुची चाळिस कोट
फोडूं साम्राज्याचे कोट
शेतकऱ्यांचें कामकऱ्यांचे
निशाण धरुनी उंच क्रांतिचें

फोडूं नरडें जुलुमशाहिचें
मंत्र गर्जुनी स्वातंत्र्याचे ॥२॥

देशासाठी अम्ही मरूं
प्राणांचें बलिदान करूं
मोडुनि टाकूं हे शतखंड
गुलामगिरिचे साखळदंड
चला तिरंगा धरूं निशाण
स्वतंत्र करुं या हिंदुस्थान
नव्या युगाचा वाजे डंका
मानवतेच्या ऐका हाका
अडवे येतिल ठोका त्यांना
एकमुखानें करा गर्जना ॥३॥

## सहज सख्या एकटाच

### सूर्यकांत खांडेकर

सहज सख्या, एकटाच येइं सांजवेळीं
वाट तुझी पाहिन त्या आम्रतरूखालीं ।।धृ.।।

हिरवळींत गीत गात
सांजरंगिं न्हात न्हात
स्वप्नांना रंगवुंया लेवुनिया लाली ।।१।।

अधरीं जें अडत असे
सांगिन तुज गूज 'असें'
प्रीती ही प्रीतीविण अजुनही अबोली ।।२।।

तृणपुष्पें मोहक तीं
उमलतील एकांतीं
चांदण्यांत उमलवुं या प्रीत भावभोळी ।।३।।

# अजून त्या झुडुपांच्या मागें

वसंत बापट

अजून त्या झुडुपांच्या मागें
सदाफुली दोघांना हंसते
अजून अपुल्या आठवणींनीं
शेवंती लजवंती होते ॥धृ.॥

तसें पहाया तुला मला ग,
अजून दंवबिंदू थरथरतो
अर्ध्यामुर्ध्या कानगुजास्तव
अजून ताठर चंपक झुरतो ॥१॥

पाठ आठवुन तुझी बिलोरी
अजून हिरवळ हिरमुसलेली
चुंबायाला तुझीं पावलें
फूलपाखरें आसुसलेलीं ॥२॥

अजून गुंगीमधें मोगरा,
त्या तसल्या केसांच्या वासें
अजून त्या पात्यांत लव्हाळी
होतच असतें अपुलें हासें ॥३॥

अजून फिक्कट चंद्राखालीं
माझी आशा तरळत आहे
गीतांमधलें गरळ झोकुनी
अजून वारा बरळत आहे ॥४॥

# शुक्रतारा मंद वारा

**मंगेश पाडगावकर**

तो : शुक्रतारा, मंद वारा
चांदणें पाण्यांतुनी
चंद्र आहे, स्वप्न वाहे
धुंद या गाण्यांतुनी
आज तूं डोळ्यांत माझ्या
मिसळुनी डोळे पहा
तूं अशी जवळी रहा ॥१॥

ती : मी कशी शब्दांत सांगूं
भावना माझ्या तुला?
तूं तुझ्या समजून घे रे
लाजणाऱ्या या फुला
अंतरींचा गंध माझ्या
आज तूं पवना वहा
तूं असा जवळी रहा ॥२॥

तो : लाजऱ्या माझ्या फुला रे
गंध हा बिलगे जिवा
अंतरींच्या स्पंदनानें
अन् थरारे ही हवा
भारलेल्या या स्वरांनीं

भारलेला जन्म हा
तूं अशी जवळी रहा...॥३॥

ती : शोधिलें स्वप्नांत मीं तें
ये करीं जागेपणीं
दाटुनी आलास तूं रे
आज माझ्या लोचनीं
वांकला फांदीपरी
आतां फुलांनीं जीव हा
तूं असा जवळी रहा...॥४॥

## निळासावळा नाथ

### गंगाधर महांबरे

निळासावळा नाथ, तशी ही
निळी सावळी रात
कोडें पडतें तुला शोधितां
कृष्णा अंधारांत ॥धृ.॥

तुडवुनि वन धुंडुनि नंदनवन
शोधुनि आलें अवघें त्रिभुवन
एक न उरलें गोपीचें घर
हांकेच्या टप्प्यांत ॥१॥

नील जलीं यमुनेच्या साची
होडि सोडिली मी देहाची
गवसलाच ना परि तूं कान्हा
लाटांच्या रासांत ॥२॥

# हरवलें तें गवसलें का ?

**पी. सावळाराम**

हरवलें तें गवसलें कां ?
गवसले तें हरवलें कां? ॥ धृ.॥

मीलनाचा परिमल तोचि,
फूल तेंची त्या स्वरूपीं
पापण्यांच्या उघडझापीं
हास्य उमले वेगळें कां ? ॥१॥

पावसाळीं ग्रीष्म सरिता
सागराला फिरुनि मिळतां
जलाशयाची सृष्टी आतां
मृगजळें हीं व्यापिली कां ? ॥२॥

दूर असतां जवळ आलें
जवळ येतां दूर गेलें
जों न माझें दुःख हसलें
तोचि सुखही दुखावलें का ? ॥३॥

## ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती

मनमोहन नातू

ती पहा, ती पहा,
बापुजींची प्राणज्योती ।
तारकांच्या सुमनमाला,
देव त्यांना वाहती ॥धृ.॥

झुंजला राजासवें हा
रंगला रंकांसवें हा
पेटतां देहेंहि आतां,
दिव्यता दावून जाती ॥१॥

चंदनाचें खोड लाजे
हा झिजे त्याहूनही
आज कोटी लोचनींच्या
अश्रुमाला सांडताती ॥२॥

पृथ्विच्या अक्षांशिं लाली
पृथ्विच्या रेखांशिं लाली
चार गोळ्या ज्या उडाल्या,
दशदिशांना कांपताती ॥३॥

नांव ज्याचें ऐकुनीया
थरकली सिंहासनें
ना जरी तलवार हातीं,
हा अहिंसेचा पुजारी ॥४॥

सत्य मानी देव आणि
झुंजला खोट्यासवें हा
मृत्युच्या अंतीम वेळीं,
नाम रामाचें मुखीं ॥५॥

सिंधु गंगा आणि यमुना
धन्य झाली अस्थिंनीं
राख तूझी भारताच्या,
तिलक झाली रे ललाटीं ॥६॥

# प्रतिमा उरीं धरोनी

## द. वि. केसकर

प्रतिमा उरीं धरोनी
मी प्रीतिगीत गावें ॥धृ.॥

तें गीत प्रीतिचें रे
हळुवार मी म्हणावें
अस्फूट भावनांच्या
स्वप्नांत गुंग व्हावें ॥१॥

पुष्पांत गंध जैसा
गीतांत भाव तैसा
अद्वैत प्रीतिचें हें
मम जीवनीं असावें ॥२॥

तूं सप्तरंग धनुचे
स्वर सात बांसरीचे
संगीत जीवनाचें
अळवीत मी बसावें ॥३॥

कां रोहिणीस वाटे
चंद्रासवें असावें
हें भावस्वप्न अपुरें
साकार तूं करावें ॥४॥

# उषःकाल होतां होतां

## सुरेश भट

उषःकाल होतां होतां
काळरात्र झाली।
अरे, पुन्हा आयुष्यांच्या
पेटवा मशाली ! ॥धृ.॥

अम्ही चार किरणांचीही
आस कां धरावी ?
जें कधींच नव्हतें त्याची
वाट कां पहावी ?
कसा सूर्य अंधाराच्या
वाहतो पखाली ! ॥१॥

तेच घाव करिती फिरुनी
ह्या नव्या कट्यारी,
तेच दंश करिती आम्हां
साप हे विषारी।
अम्ही मात्र ऐकत असतों
आमुची खुशाली ! ॥२॥

तिजोऱ्यांत केले त्यांनीं
बंद स्वर्ग साती
अम्हांवरी संसाराची
उडे धूळमाती

आम्ही तीं स्मशानें ज्यांना
प्रेतही न वाली ! ॥३॥

अशा कशा ज्यानें त्यानें
गाडल्या उमेदी ?
असा कसा जो तो येथें
होतसे खरेदी !
त्या अपार दुःखाचीही
चालली दलाली ! ॥४॥

उभा देश झाला आतां
एक बंदिशाला
जिथें देवकीचा पान्हा
दुधाने जळाला !
कसें पुण्य दुर्दैवी अन्
पाप भाग्यशाली ! ॥५॥

धुमसतात अजुनी विझल्या
चितांचे निखारे !
अजुन रक्त मागत उठती
वधस्तंभ सारे
आसवेंच स्वातंत्र्याचीं
आम्हाला मिळालीं ! ॥६॥

## उर्मिले, त्रिवार वंदन तुला

**राजा मंगळवेढेकर**

उर्मिले, त्रिवार वंदन तुला! ॥ धृ.॥

त्यजुनि राजसुख जरी जानकी
वनांत गेली प्रभु-सांगातीं
राजमंदिरीं तूंच साहिल्या
वियोगांतल्या कळा ॥१॥

सतत सावलीसम रामाला
भ्राता लक्ष्मण कृतार्थ झाला
तुझ्या मनांतिल मुक्या भावना
कधीं न तो उमगला ॥२॥

अंधारांतिल तूं ज्योतीसम
आयु वेचिलें अपुलें कण कण
सुख-तृप्तीचा कधिं न तुला गे
वाराही लाभला ॥३॥

राम-जानकी वियोगांतुनी
घडलें रामायण हें भुवनीं
तुझी तपस्या, तुझा त्याग परि
नच लोकीं ठसला ॥४॥

थोरचरित तूं, दूर राहुनी
सुगंध भरला तूं रामायणिं
उपेक्षाच परि तुझ्या कपाळीं
न्याय जगीं आगळा ॥५॥

## अशीच अमुची आई असती

**मधुकर जोशी**

अशीच अमुची आई असती
सुंदर रूपवती
आम्हीहि सुंदर झालों असतों
वदले छत्रपती ! ॥ धृ.॥

शिवरायाच्या दरबारीं त्या
युवती मोहक ती
सुभेदारची सून लाडकी
भयकंपित होती
शब्द ऐकतां चकित जाहली
हरिणीसम ती रती ! ॥१॥

वसंतातलें यौवन होतें
नयनीं मादकता
रूप अलौकिक मनमोहक तें
कोमल बाहुलता
सौंदर्याची प्रतिमा परि ती
प्रभू माता मानिती ! ॥२॥

अलंकार ते वस्त्रभूषणें
देउन मानानें
परत सासरीं पाठविलें तिज
शिवभूपालानें
रायगडाच्या पाषाणांतुन
शब्द अजुन येती ! ॥३॥

# पाऊस कधींचा पडतो

## ग्रेस

पाऊस कधींचा पडतो
झाडांचीं हलती पानें
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुरानें. ॥१॥

डोळ्यांत उतरलें पाणी
पाण्यावर डोळे फिरती
रक्ताचा उडला पारा
या नितळ उतरणीवरती. ॥२॥

पेटून कशी उजळेना
ही शुभ्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहरापाशीं
पाऊस असा कोसळला. ॥३॥

संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरतीं
लाटांचा आज पहारा. ॥४॥

## जीवाच्या जिवलगा

### संजीवनी मराठे

जीवाच्या जिवलगा नंदलाला रे. ॥ धृ.॥

यमुनेत तुझ्यामाझ्या बिंब मुखांचें
बासरींत तुझ्यामाझ्या गीत सुखाचें
स्मरणानें जीव माझा धुंद झाला रे. ॥१॥

चांदण्यांची नित्य नवी रासलीला रे
पाखरांच्या गळां नवी गीतमाला रे
कमळदळांत नवा गंध आला रे. ॥२॥

माझ्या कानीं ओळखीचा साद आला रे
प्रभू तुझ्या पावलांचा नाद झाला रे
धावलें मी तुझ्या पदवंदनाला रे. ॥३॥

# केशवा, माधवा

## रमेश अणावकर

केशवा, माधवा,
तुझ्या नामांत रे गोडवा ॥ धृ.॥

तुझ्यासारखा तूंच देवा
तुला कुणाचा नाहीं हेवा
वेळोवेळीं संकटांतुनी
तारिशी मानवा ॥१॥

वेडा होउन भक्तीसाठीं
गोपगड्यांसह यमुनाकाठीं
नंदाघरच्या गाइ हांकशी
गोकुळीं यादवा ॥२॥

वीर धनुर्धर पार्थासाठीं
चक्र सुदर्शन घेउन हातीं
रथ हांकुनिया पांडवांचा
पळविशी कौरवां ॥३॥

# इथेंच आणी या बांधावर

## सुधांशु

इथेंच आणी या बांधावर
अशीच श्यामल वेळ
सख्या रे, किती रंगला खेळ ! ॥ धृ.॥

शांत धरित्री शांत सरोवर
पवन झुळझुळे शीतल सुंदर
अबोल अस्फुट दोन जिवांचा
अवचित जमला मेळ. ॥१॥

रातराणिचा गंध दर्वळे
धुंद कांहिंसें आंतुन उसळें
चंद्र हांसला, लवली खालीं
नक्षत्रांची वेल. ॥२॥

पहांटच्या त्या दवांत भिजुनी
विरली हळुहळु सुंदर रजनी
स्वप्नसुमावर अजुनि तरंगे
ती सोन्याची वेळ. ॥३॥

# डाव मांडून भांडून मोडूं नको

**ना. घ. देशपांडे**

डाव मांडून भांडून मोडूं नको ॥धृ.॥

आणलें तूं तुझें सर्व, मी आणलें,
सर्व कांहीं मनासारखें मांडलें,
तूंच सारें तुझें दूर ओढूं नको ॥१॥

सोडले मीं तुझ्याभोवतीं सर्व गे,
चंद्रज्योतीरसाचे रुपेरी फुगे,
फुंकरीनें फुगा, हाय, फोडूं नको ॥२॥

'गोकुळींचा सखा' तूंच केलें मला,
कौतुकानें मला हार तूं घातला,
हार हांसून घालून तोडूं नको ॥३॥

काढलें मीं तुझें नांव, तूं देखिलें,
आणि माझें पुढें नांव तूं रेखिलें,
तूंच वाचून लाजून खोडूं नको ॥४॥

## कधीं बहर, कधिं शिशिर

**मंगेश पाडगावकर**

कधीं बहर, कधिं शिशिर परंतू
दोन्ही एक बहाणे
डोळ्यांमधले आंसू पुसती
ओठावरलें गाणें ॥ धृ.॥

बहर धुंद वेलीवर यावा
हळुच लाजरा पक्षी गावा
आणि अचानक गळुन पडावीं
विखरुन सगळीं पानें ॥१॥

कातरवेळीं मिठी जुळावी
पहांट कधिं झाली न कळावी
भिन्न दिशांना झुरत फिरावे
नंतर दोन दिवाणे ॥२॥

हळुच फुलांच्या बिलगुनि गालीं
नाजुक गाणीं कुणी गायिलीं
आतां उरली आर्त विराणी
सूरच केविलवाणे ॥३॥

जुळलीं हृदयें, सूरहि जुळले
तुझें नि माझें गीत तरळलें
कातरवेळे व्याकुळ डोळे
स्मरून आतां जाणें ॥४॥

# बलसागर भारत होवो

## सानेगुरुजी

बलसागर भारत होवो
   विश्वांत शोभुनी राहो ।। धृ.।।

हें कंकण करिं बांधियलें
जनसेवे जीवन दिधलें
देशार्थ प्राण हे उरले
   मी सिद्ध मरायाला हो ।।१।।

वैभवीं देश चढवीन
सर्वस्व त्यास अर्पीन
तिमिर घोर संहारीन
   या बंधु सहाय्याला हो ।।२।।

हातांत हात घेऊन
हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून
   या कार्य करायाला हो ।।३।।

करिं दिव्य पताका घेऊं
प्रिय भारतगीतें गाऊं
विश्वास पराक्रम दावूं
   ही माय निजपदा लाहो ।।४।।

या उठा करूं हो शर्थ
संपादुं दिव्य पुरुषार्थ
हें जीवन ना तरि व्यर्थ
भाग्यसूर्य तळपत राहो ॥५॥

ही मुक्त माय होईल
वैभवें दिव्य शोभेल
जगतास शांति देईल
तो सोन्याचा दिन येवो ॥६॥

## स्वप्नांतल्या कळ्यांनों

म. पां. भावे

क्र. ६६२८ २।२।९९

स्वप्नांतल्या कळ्यांनों
  उमलूं नकाच केव्हां
गोडी अपूर्णतेची
  लावील वेड जीवा ॥ धृ.॥
रेखाकृती सुखाच्या
  चित्तीं चितारलेल्या
साशंक कल्पनांनीं
  सहजीं विरून गेल्या
कधिं सोशिला उन्हाळा
  कधिं लाभला विसावा ॥१।
नैराश्य कृष्णमेघीं,
  आशा कधीं बुडावी
विरहांत चिंब भिजुनी
  प्रीती फुलोनि यावी
काट्याविना न हातीं
  केव्हां गुलाब यावा ॥२॥
सिद्धीस कार्य जातां,
  येते सुखास जडता
जडतेंत चेतनेला,
  उरतो न कोणि त्राता
अतृप्त भावनांनी
  जीवांत जीव यावा ॥३॥

# परीकथेंतिल राजकुमारा

## वंदना विटणकर

परीकथेंतिल राजकुमारा
स्वप्नीं माझ्या येशिल का ?
भाव दाटले मनीं अनामिक
साद तयांना देशिल का ? ॥धृ.॥

या डोळ्यांचे गूढ इशारे
शब्दांवांचुन जाणुन सारें
राणी अपुली मला म्हणोनी
तुझियासंगें नेशिल का ? ॥१॥

मूर्त मनोरम मनीं रेखिली
दिवसारात्रीं नित्य देखिली
त्या रूपाची साक्ष जिवाला
प्रत्यक्षांतुन देशिल का ? ॥२॥

लाजुन डोळे लवविन खालीं
नवख्या गालीं येइल लाली
फुलापरी ही तनू कापरी
हृदयापाशीं घेशिल का ? ॥३॥

लाजबावरी मिटुन पापणी
साठवीन तें चित्र लोचनीं
नवरंगी त्या चित्रामधलें
स्वप्नच माझें होशिल का ? ॥४॥

## मालवून टाक दीप

### सुरेश भट

मालवून टाक दीप चेतवून अंगअंग !
राजसा किती दिसांत लाभला निवांत संग ! ॥धृ.॥

त्या तिथे फुलांफुलांत
पेंगते अजून रात,
हाय तूं करूं नकोस एवढ्यांत स्वप्नभंग ! ॥१॥

गारगार या हवेंत
घेउनी मला कवेंत
मोकळें करून टाक एकवार अंतरंग ! ॥२॥

दूरदूर तारकांत
बैसली पहाट न्हात
सावकाश घे टिपून एकएक रूपरंग ! ॥३॥

हें तुला कसें कळेल ?
कोण एकटें जळेल ?
सांग, का कधीं खरेंच एकटा जळे पतंग ? ॥४॥

काय हा तुझाच श्वास ?
दर्वळे इथें सुवास !
बोल रे हळू, उठेल चांदण्यावरी तरंग ! ॥५॥

# जन पळभर म्हणतिल

## भा. रा. तांबे

जन पळभर म्हणतिल 'हाय हाय' !
  मी जातां राहिल कार्य काय ? ॥ धृ.॥

सूर्य तळपतिल, चंद्र झळकतिल ,
तारे अपुला क्रम आचरतिल,
असेच वारे पुढें वाहतिल,
  होईल कांहिं का अंतराय ? ॥१॥

मेघ वर्षतिल, शेतें पिकतिल,
गर्वानें या नद्या वाहतिल,
कुणा काळजी कीं न उमटतिल
  पुन्हा तटावर हेच पाय ? ॥२॥

सखेसोयरे डोळे पुसतिल,
पुन्हा आपुल्या कामिं लागतिल
उठतिल, बसतिल, हंसुनि खिदळतिल
  मी जातां त्यांचें काय जाय ? ॥३॥

रामकृष्णही आले, गेले !
त्यांविण जग का ओसचि पडलें ?
कुणी सदोदित सूतक धरिलें ?
  मग काय अटकलें मजशिवाय ? ॥४॥

अशा जगास्तव काय कुढावें !
मोहिं कुणाच्या कां गुंतावें ?
हरिदूता कां विन्मुख व्हावें ?

कां जिरवुं नये शांतींत काय ? ॥५॥

संग्रहालय ठाणे
२६१९७
काव्य

## श्रीरामाचे चरण धरावे

### यशवंत देव

श्रीरामाचे चरण धरावे
दर्शनमात्रें पावन व्हावें ॥ धृ.॥

सती अहिल्या दगडामाजीं
शापित होउन युगयुग मोजी
परी प्रभूच्या पदस्पर्शानें
पाषाणासहि जीवन द्यावें ! ॥१॥

उष्टीं बोरें अर्पुन प्रभुला
शबरीनें जणु ठाव पाहिला
स्वीकारुन तीं रघुरायानें
देवपणाचें बीरुद ल्यावें ॥२॥

वनवासांतच जीवन सरलें
रामायणही तिथेंच घडलें
अयोध्येस प्रभु परतुन येतां
प्रेमाश्रूंनीं नगर भिजावें ॥३॥

## धागा धागा अखंड विणुं या

पी. सावळाराम

धागा धागा अखंड विणुं या
विठ्ठल विठ्ठल मुखें म्हणूं या ॥ धृ.॥

अक्षांशांचे रेखांशांचे
उभे आडवे गुंफुन धागे
विविधरंगी वसुंधरेचें
वस्त्र विणिलें पांडुरंगें
विश्वंभर तो विणकर पाहिला
कार्यारंभीं नित्य स्मरूं या ॥१॥

करचरणांच्या मागावरती
मनामनांचे तंतू टाका
फेकुन शेला अंगावरतीं
अर्धी उघडी लाज राखा
बंधुत्वाचा फिरवित चरखा
एकत्वाचें सूत्र धरूं या ॥२॥

# होईल संक्रांत तेव्हां खरी

## यतीश लोंढे

दुर्दम्य होतील आशाआकांक्षा
होतील संग्रामगीतें पुरीं
देशार्थ होतील त्यागी विरागी
होईल संक्रांत तेव्हां खरी ॥ धृ.॥

सुवर्णाचलाचे कुणीही किती
कडे तोडुनी जाळुनीया क्षिती
ही राख केली तुझ्या वैभवाची
हातांत आली सुकी खापरी
पेटेल अंगार झाडून ती राख
होईल संक्रांत तेव्हां खरी ॥१॥

सद्भावनांना नुरे माधुरी
बसावें शिरीं कोणि स्कंधावरी
घेशील तूं सूड फाडूनिया ऊर
जाईल लोपोनिया आसुरी
मानव्य नांदेल येथें सुखानें
होईल संक्रांत तेव्हां खरी ॥२॥

जरी राखणें धर्म, भाषा, रिती
तुझीं तींच देवालयें, संस्कृती
राहून कक्षेंत, वागून आज्ञेंत

धावून कर्तव्यधारेवरी
होतील सैनीक देतीलही प्राण
होईल संक्रांत तेव्हां खरी ॥३॥

जसा हिंदु-भानू वरी उंच ये
दुरावेल अंधार नष्ट स्वयें
होऊनियां भाट काढूनियां वाट
जातील दारीं, गिरींकंदरीं
देतील संदेश या संस्कृतीचा
होईल संक्रांत तेव्हा खरी ॥४॥

# मी काय तुला वाहूं ?

## कुसुमाग्रज

मी काय तुला वाहूं ?
तुझेंच अवघें जीवितवैभव
काय तुला देऊं ? ।।धृ.।।

नक्षत्रांच्या रत्नज्योती
तुझिया ओटीवरि झळझळती
दीप रात्रिंचे घरिं तुजपुढतीं
वात काय लावूं ? ।।१।।

चतुर फुलारी वसंत फुलवित
तुजसाठीं सुमसंचय अगणित
कशी लाजरी अर्धसुगंधित
कळी करीं देऊं ? ।।२।।

झुलती तव सदनांच्या दारीं
सांज-उषेचे पट जरतारीं
विणतो विधु अंबर चंदेरी
वसन कुठें पाहूं ? ।।३।।

एकच आहे माझी दौलत
नयनींचा हा अश्रु तरंगत
मानवतेचें ज्यांत मनोगत
तोच पदीं वाहूं ? ।।४।।

## सखि, मंद झाल्या तारका

### सुधीर मोघे

सखि, मंद झाल्या तारका
आतां तरी येशील का ? ॥धृ.॥

मधुरात्र मंथर देखणी
आली तशी गेली सुनी
हा प्रहर अंतिम राहिला,
त्या अर्थ तूं देशील का ? ॥१॥

हृदयांत आहे प्रीत अन्
ओठांत आहे गीतही
तें प्रेमगाणें छेडणारा,
सूर तूं होशील का ? ॥२॥

जें जें हवेंसें जीवनीं
तें सर्व आहे लाभलें
तरिही उरे कांहीं उणें,
तूं पूर्तता होशील का ? ॥३॥

बोलावल्यावांचूनही
मृत्यू जरी आला इथें
थांबेल तोही पळभरी...
पण सांग तूं येशील का ? ॥४॥

# उघड उघड उघड दार

## अनिल

उघड उघड उघड दार
प्रियकरास आपुल्या
उघड दार, उघड दार...॥ ध्रु.॥

मध्यरात्रिंच्या नभांत
शांत चांदणें खुले
पांघरून रश्मिजाल
गाढ झोपलीं फुलें ॥१॥

गाढ झोपलीं फुलें
अजुन हा निजे न भृंग
मरंद-गुंगिनें भुलून
मंजु गुंजनांत दंग ॥२॥

अधिर त्या नको सकाळ
त्या दिशाहि उजळल्या
मध्यरात्रिंच्या निळ्यांत
उघड उघड पाकळ्या ॥३॥

# माझा पानमळा पानमळा

## वि. म. कुलकर्णी

माझा पानमळा पानमळा ॥ धृ.॥

इथुन तिथुन काळीशार होती धरणी
मी वाफे पाडून काडें मोडून केली पेरणी
अंकुर कवळा कवळा ॥१॥

हो समद्या शिवारांत जित्रापांत मळा झुले
हा पंख पसरुनी खुल्या मनीं मोर डुले
माझा दिल हरवला ॥२॥

धरतीची केली निगा कशी बघा देवापरी
कमी नाहीं दौलतीला लक्षुमीला आणीन घरीं
बढती माझ्या कुळा ॥३॥

या राव बसा तरी देतों घरीं मुंबई खुडा
या घरधनिणीला रंगवाया ओठकडा
घरीं तुमचा पिकल मळा ॥४॥

## प्रीती जडली तुझ्यावरी

### शांता ज. शेळके

प्रीती जडली तुझ्यावरी,
कळेल का तें तुला कधीं ?
कळेल का तें तुला कधी,
काय उमलतें मनामधीं ? ॥धृ.॥
नजर भेटतां नजरेला,
बिंब लोचनीं तें हसतें
धडधडतें काळीज उरीं,
वीज नसांमधुनी घुसते
ओठांवर जें थरथरतें,
ओळखशिल कां सांग कधी ? ॥१॥
पैलतिरावर मूर्ति तुझी,
वाट बघें मी ऐलतिरीं
पावा घुमतो एक इथें,
सूर भरी लहरी लहरी
कसें पोचवूं गीत तुला
अफाट वाहे मधें नदी ! ॥२॥
ताण सोसवे मुळीं न हा,
व्याकुळ झाला जीव अतां
फुलल्यावांचुन सुकायची,
अशीच का ही प्रेमकथा ?
साद घातली मीं तुजला,
देशिल तूं पडसाद कधीं ? ॥३॥

## गळ्याची शपथ तुला जिवलगा...

ग. ल. ठोकळ

गळ्याची शपथ तुला जिवलगा,
तुला जिवलगा ॥ धृ.॥

मुखीं सुधेचा कलश लाविला
एकहि नाहीं घोट घेतला
नकोस घेऊं असा हिसकुनी
नकोस देऊं दगा ॥१॥

वेल प्रीतिची तूंच लाविली
रुजली, फुटली, फुलूं लागले
नको चुरगळूं असा कठोरा
तूंच राखिली निगा ॥२॥

तहान हरली भूकहि हरली
एकच आशा मनांत धरली
पुन्हां बोल ती नाजुक भाषा
तूंच जिवाचा सगा ॥३॥

# यमुनाकाठीं ताजमहाल

## अनिल भारती

यमुनाकाठीं ताजमहाल
बादशहाच्या अमर प्रीतिचें
मंदिर एक विशाल ॥ धृ.॥

मूर्तिमंत झोपली प्रीत अन्
मृत्यूचें ओढून पांघरुण
जीवन कसलें महाकाव्य तें
गाइल जग चिरकाल ॥१॥

निःशब्द शांती अवतींभवतीं
हिरे जडविले थडग्यावरती
एकच पणती पावित्र्याची
जळते येथ खुशाल ॥२॥

हळूच या रसिकांनों येथें
नका वाजवूं पाऊलांतें
ह्याच गुलाबी झोपेमध्यें
सरला त्यांचा काळ ॥३॥

# शोधिसी मानवा, राउळीं मंदिरीं

**वंदना विटणकर**

शोधिसी मानवा, राउळीं मंदिरीं
नांदतो देव हा आपुल्या अंतरीं ॥ धृ.॥

मेघ हे दाटती कोठुनी अंबरीं
सूर येती कसे, वाजते बांसरी
रोमरोमीं फुलें, तीर्थ हें भूवरी
दूर इंद्रायणी दूर ती पंढरी ॥१॥

गंध का हांसतो पाकळी सारुनी
वाहते निर्झरीं प्रेमसंजीवनी
भोवतालीं तुला साद घाली कुणी
खूण घे जाणुनी रूप हें ईश्वरी ॥२॥

भेटतो देव का पूजनीं अर्चनीं
पुण्य का लाभतें दानधर्मांतुनी ?
शोध रे दिव्यता आपुल्या जीवनीं
आंधळा खेळ हा खेळशी कुठवरी ? ॥३॥

# आला खुशींत समिंदर

## अनंत काणेकर

आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर,
होडीला देइ ना ठरूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं ! ॥धृ॥

हिरवं हिरवं पाचूवाणी जळ,
सफेत् फेसाची वर खळबळ,
माशावाणी काळजाची तळमळ
माझि होडी समिंदर, ओढी खालींवर,
पाण्यावर देइ ना ठरूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं! ॥१॥

तांबडं फुटे आभाळांतरीं,
रक्तावाणी चमक् पाण्यावरी,
तुझ्या गालावर तसं काइ तरी!
झाला खुळा समिंदर, नाजुक् होडीवर,
लाटांचा धिंगा सुरू,
ग सजणे, होडीला बघतो धरूं ! ॥२॥

सूर्यनारायण हंसतो वरी,
सोनं पिकलं दाहिदिशांतरीं,
आणि माझ्याहि नवख्या उरीं !

आला हंसत् समिंदर, डुलत फेसावर,
होडीशीं गोष्ट करूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं! ॥३॥

गोऱ्या भाळीं तुझ्या लाल् चिरी,
हिरव्या साडीला लालभडक धारी,
उरीं कसली ग, गोड शिरशिरी ?
खुशी झाला समिंदर, त्याच्या उरावर,
चाले होडी भुरुभुरू,
ग सजणे, वाऱ्यावर जणुं पांखरूं ! ॥४॥

## माती सांगे कुंभाराला

### मधुकर जोशी

माती सांगे कुंभाराला
पायीं मज तुडविसी
तुझाच आहे शेवट वेड्या
माझ्या पायाशीं ! ॥ धृ.॥

मला फिरविसी तूं चाकावर
घट मातीचे घडवीं सुंदर
लग्नमंडपीं कधीं असें मी
कधीं शवापाशीं !॥१॥

वीर धुरंधर आले गेले
पायीं माझ्या इथें झोपले
कुब्जा अथवा मोहक युवती
अंतीं मजपाशीं ! ॥२॥

गर्वाने कां ताठ राहसी ?
भाग्य कशाला उगा नाससी ?
तुझ्या ललाटीं लिहिलें आहे
मीलन माझ्याशीं !॥३॥

## अजून नाहीं जागी राधा

**इंदिरा संत**

अजून नाहीं जागी राधा
अजून नाहीं जागें गोकुळ
अशा अवेळी पैलतिरावर,
आज घुमे कां पांवा मंजुळ ? ॥१॥

मावळतीवर चंद्र केशरी,
पहांटवारा भंवतीं भणभण,
अर्ध्या पाण्यामध्यें उभी ती
तिथेंच टाकुन अपुलें तनमन ! ॥२॥

विश्वच अवघें ओठां लावुन,
कुब्जा प्याली तो मुरलीरव
डोळ्यांमधले थेंब सुखाचे,
हे माझ्यास्तव, हे माझ्यास्तव ॥३॥

# तुझें बघणें

विनायक राहतेकर

तुझें बघणें
हृदय जिंकुनी रोमांचाचीं लाख फुलें फुलविणें

तुझें हसणें
श्रावणांतल्या नील घनाचें जणूं वर्षणें
मोरपिसांनीं तनमन स्पर्शुन मोहरुनी जाणें

तुझें वदणें
मीपण विसरुन स्वतःस हरवुन कान जिवाचे करणें

तुझें असणें
विशाल गगनीं इंद्रधनूचे रंग मनोहर दिसणें

तुझें वेड हें
तुझ्या दिशेचा ओघ वाहतां कधीं न मागें फिरणें
कधिं न थांबणें, कधिं न थांबणें, अखेर येउन मिळणें

# सांग पोरी सांग सारें

मनमोहन नातू

सांग पोरी सांग सारें,
सांग पोरी सांग सारें
लाजतेस कां ? सांग सारें ॥धृ.॥

दोन वेण्या तीनपेडी
घालुनी चढलीस माडी
खालिं येतांना परंतू
मोकळे सारे पिसारे ॥१॥

नीज कां ग झेप घेते
पापणीचें लाल पातें
मंद कां रात्रींत झाले
कालचे तेजाळ तारे ? ॥२॥

कुंकु भाळीं पांगलेलें
गाल दोन्ही गुंजलेले
मैत्रिणींशीं बोलतांना
अंग तूझें कां शहारे ? ॥३॥

## नीज माझ्या नंदलाला

**मंगेश पाडगांवकर**

नीज माझ्या नंदलाला
नंदलाला रे ॥धृ.॥

शांत हें आभाळ सारे
शांत तारे, शांत वारे
या झऱ्याचा सूर आतां मंद झाला,
मंद झाला रे ॥१॥

झोपल्या गोठ्यांत गाई
साद वा पडसाद नाहीं
पाखरांचा गल्बलाही बंद झाला,
बंद झाला रे ॥२॥

सावल्यांची तीट गालीं
चांदण्याला नीज आली
रातराणीच्या फुलांचा गंध आला,
गंध आला रे ॥३॥

नीज रे आनंदकंदा
नीज रे माझ्या मुकुंदा
आवरीं या घागऱ्यांच्या छंदताला,
छंदताला रे ॥४॥

# आली कुठूनशी कानीं

## सोपानदेव चौधरी

आली कुठूनशी कानीं
टाळ—मृदुंगाचि धून
नाद विठ्ठल विठ्ठल
उठे रोमरोमांतुन ॥१॥

नभीं तेजांत नाहली
चंद्रप्रभा चंद्रायणी
बोले शब्दावीण कांहीं
चंद्रासवें इंद्रायणी ॥२॥

इंद्रायणीच्या पाण्यांत
शहारलें अंगअंग
मन झालें ओलें चिंब
जैसे भिजले अभंग ॥३॥

वृक्ष दिसला सामोरी
काय सांगूं त्याची शोभा
जसे कटीवरी हात
युगें अठ्ठावीस उभा ॥४॥

कण वाळूचेही येथें
कैसे कनवाळू झाले
वाळवंटही पाण्यांत
विरघळूनियां गेलें ॥५॥

भूक नयनांची सरे
मूक वाचा ये रंगांत
माझा देह झाला देहू
तुकयाच्या अभंगांत ॥६॥

## मीलनास आपुल्या

### गंगाधर दांडेकर

मीलनास आपुल्या,
साक्ष धवल चंद्रकोर
अक्षता अन् मंत्र नको,
नको साक्षि सनइ सूर ।। धृ.।।

का असे न ऋतु वसंत
मन-कोकिळ गाइ गीत
रातकिडा देइ साथ,
छेडुनियां एक सूर ।।१।।

धुंद गंध दरवळला
लतामंडपीं सगळ्या
भूषविते अधिक ज्यास
पुष्पशेज नक्षिदार ।।२।।

येइ सखे, ये समीप
नभ उजळित लक्ष दीप
देहलता तव कांपे,
स्पर्शतांच पवन गार ।।३।।

कां ग आज तूं अबोल
रंगले गुलाब गाल
अमृत गे तव मुखिंचें
पिउनि धन्य मी पामर ।।४।।

# घरांत हसरे तारे

## द. वि. केसकर

घरांत हसरे तारे, असतां,
पाहुं कशाला नभाकडे ॥धृ.॥

छकुल्यांचीं ग, प्रशांत वदनें
गोड गुलाबी गालीं हसणें
अमृत त्यांच्या ओठीं असतां
कशास मधुघट हवा गडे ॥१॥

गोजिरवाणीं जशीं वासरें
प्रेमळ माझीं गुणी लेकरें
स्वर्ग अवतरे घरांत माझ्या
आनंदाचे पडति सडे ॥२॥

गोकुळ येथें गोविंदाचें
झरे वाहती शांतिसुखाचे
वैभव पाहुन मम सदनींचें
ढगाआड ग, चंद्र दडे ॥३॥

## आठवणी दाटतात

योगेश्वर अभ्यंकर

जें घडलें तें सगळें,
सांग कसें विसरावें
आठवणी दाटतात,
धुकें जसें पसरावें ॥१॥

विसरावें नांव गांव
आणि तुझे हावभाव
मूक भाव नजरेंतिल,
हृदयाला उमजावे ॥२॥

रात्र अशी अंधारी,
उरलेली संसारीं
सोबतीस पहांटेस,
विरहाचें स्वप्न हवें ॥३॥

स्वप्नांतिल जादु अशी,
मज गमते अविनाशी
प्रेम तुझें सत्य गमे,
त्यास कसें विसरावें ? ॥४॥

## तुझ्या कामामधुन, तुझ्या घामामधुन

**वसंत बापट**

तुझ्या कामामधुन, तुझ्या घामामधुन
उद्या पिकंल सोन्याचं रान
चल उचल हत्यार, गड्या होउन हुषार
तुला नव्या जगाची आण ॥ धृ.॥

तुझ्या घणाच्या घावामधुन
उठे उद्यांच्या जगाची आस
तुझ्या घामाच्या थेंबामधुन
पिके भुकेल्या भावाचा घास
तुझ्या ध्यासामधून, तुझ्या श्वासामधून
जुळे नव्या जगाचं गान ॥१॥

तुझ्या पोलादी टांचेखालुन
जित्या पाण्याचे निघतिल झरे
तुझ्या लोखंडी दंडामधुन
वाहे विजेचि ताकद किं रे
चल मारुन धडक, उभा फोडूं खडक
आतां कशाची भूकतहान ॥२॥

भाग्य लिहिलेलं माझंतुझं
घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं
इथं बरड माळावरी
घेउन कुदळखोरं, चला जाऊं म्होरं
देउं देशाला जीवनदान ॥३॥

## जांभुळपिकल्या झाडाखालीं

**ना. धों. महानोर**

जांभुळपिकल्या झाडाखालीं
ढोल कुणाचा वाजे जी
वादळवेडे पाय कुणाचे
झिम्मा फुगडी झाले जी ॥१॥

समिन्द्राचं भरलं गाणं
उधाणवारं आलं जी
वेड्यापिशा भक्तासाठी
पुरतं लाजिर झालं जी ॥२॥

मोडुन गेल्या जुनाट वाटा
हा बोभाटा झाला जी
चोचीमंधीं चोच टाकुनी
दाणे उष्टे झाले जी ॥३॥

जांभुळपिकल्या झाडाखालीं
कोयडं बोल बोले जी
जांभळीचं बन थोडं,
पिकून पिवळं झालं जी ॥४॥

# जीवनांत ही घडी

## यशवंत देव

जीवनांत ही घडी अशीच राहुं दे
प्रीतिच्या फुलावरी वसंत नाचुं दे ॥ धृ.॥

रंगविलें मी मनांत चित्र देखणें
आवडलें वेडीला स्वप्न खेळणें
स्वप्नांतिल चांदवा जिवास लाभुं दे ॥१॥

हळुच तुला बघण्याचा छंद आगळा
लाजेचा त्याविण का अर्थ वेगळा
स्पर्शांतुन अंगअंग धुंद होउं दे ॥२॥

पाहुं दे असेंच तुला नित्य हांसतां
जाउं दे असाच काळ शब्द झेलतां
मीलनांत प्रेमगीत धन्य होउं दे ॥३॥

## पूर्वेच्या देवा

**गंगाधर महांबरे**

पूर्वेच्या देवा, तुझें सूर्यदेव नांव
प्रभातींच येशी सारा जागवीत गांव ।।धृ.।।

विधाता जगाचा तूंची उधळीत आशा
उजळिशी येतां येतां सभोवतीं जग दिशा
रथ तुझा सोनियाचा धांवे भरधांव ।।१।।

अंधारास प्रभा तुझी मिळे प्रभाकर
दिवसा तूं ज्ञानदीप लावीं दिवाकर
दृष्टीला या चैतन्याचा तुझा पेहराव ।।२।।

पुष्पपत्रदानाची रे तुला नसे आस
तूंच चालुनियां येशी माझिया घरास
भक्तांठायीं गुंतलासे तुझा भक्तिभाव ।।३।।

## आषाढाच्या सघन घनासम

### प्रवीण दवणे

आषाढाच्या सघन घनासम
साजण अवचित आला ग
बेसावध मी असतांनाही
बरसुन अलगद गेला ग ।।धृ.।।

अंधाराला गंध जुईचा
जीव त्यावरी झुलला ग
बंधन सुटतां वाऱ्यावरती
देह मोकळा फुलला ग ।।१।।

कचबंधीं त्या नकळत कोणी
हिरवा मरवा चुरला ग
भान उडालें शेजेवरती
व्याकुळ कापुर उरला ग ।।२।।

सहजच वळलें अगतिक होउन
हृदयांतुन तो भरला ग
धसमुसळी ही रीत पाहुनी
देह मिठीनें निवला ग ।।३।।

# प्रेम कोणीही करीना

## माधव जूलियन्

प्रेम कोणीही करीना, कां अशी फिर्याद खोटी?
प्रेम दे अन्यास आधीं, ठेविशी कां स्वार्थ पोटीं ?

पाहशी कीं लोक देती सुंदरींना प्रेम-भेटी,
प्रेम तें संगीन गुच्छीं, प्रेम तें रंगीन ओठीं.

हेम तू साक्षात् सुवर्णे ! बद्ध व्हावें का सुवर्णे ?
धर्मसंस्कारें प्रतिष्ठा येइना सौद्यास मोठी.

हृद्गुणाला जें अव्हेरी प्रेम तें गे कोठवेरी?
अंतराची हो जव्हेरी, फेकुनी दे गारगोटी !

आपल्या या चारुतेशीं विस्मरूनी जा सुकेशी,
भाळतां कोणास देशी कां न भक्तीची सचोटी ?

प्रीतिची ना भूक लागे ? काय सांगू मी तुला गे ?
प्रेम लाभे प्रेमळाला, त्याग ही त्याची कसोटी.

येउं दे दारीं भिकारी, भूक घे त्याची विचारीं,
चौतही चाले विचारीं, त्यास दे, दूरीं न लोटीं.

## दिसलीस तूं... फुलले ऋतू

### सुधीर मोघे

दिसलीस तूं, फुलले ऋतू
उजळीत आशा, हंसलीस तूं ॥ धृ.॥..

उरले न आंसू
विरल्या व्यथाही
सुख होउनीयां, आलीस तूं ॥१॥

जाळीत होतें
मज चांदणें जें
तें अमृताचें, केलेंस तूं ॥२॥

मौनांतुनी ये
गाणें दिवाणें
त्याचा अनामी, स्वरभास तूं ॥३॥

जन्मांत लाभे
क्षण एकदां हा
तें भाग्य माझें, झालीस तूं... ॥४॥

# गोरी गोरीपान, फुलासारखी छान

ग. दि. माडगूळकर

गोरी गोरीपान, फुलासारखी छान
दादा, मला एक वहिनी आण ॥धृ.॥

गोऱ्या गोऱ्या वहिनीची अंधाराची साडी
अंधाराच्या साडीवर चांदण्यांची खडी
चांदण्याच्या पदराला बिजलीचा बाण ! ॥१॥

वहिनीला आणायाला चांदोबाची गाडी
चांदोबाच्या गाडीला हरणांची जोडी
हरणांची गाडी तुडवी गुलाबाचें रान ! ॥२॥

वहिनीशीं गट्टि होतां तुला दोन थापा
तुला दोन थापा, तिला साखरेचा पापा
बाहुल्यांच्या परी होऊं दोघी आम्ही सान ! ॥३॥

## कैवल्याच्या चांदण्याला

### अशोकजी परांजपे

कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर
चंद्र व्हा हो पांडुरंगा, मन करा थोर ॥ धृ.॥

बालपणीं खेळीं रमलों, तारुण्य नासलें
वृद्धपणीं देवा आतां विश्व अंधारलें
त्वरा करा प्रभू आतां, दिसे पैलतीर ॥१॥

जन्ममरण नको आतां, नको येरझार
नको ऐहिकाचा नाथा, व्यर्थ बडिवार
चराचरापार न्या हो, जाहला उशीर ॥२॥

## माझ्या प्रीतिच्या फुला

### अनिल

वेळ झाली भर माध्यान्ह
माथ्यावर तळपे ऊन
नको जाऊं कोमेजून
 माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥१॥

तप्त दिशा झाल्या चारी
भाजतसे सृष्टी सारी
कसा तरी जीव धरी
 माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥२॥

वाहतात वारे जळते
पोळतात फुलल्या तनुतें
चित्त इथें मम हळहळतें
 माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥३॥

माझी छाया माझ्याखालीं
तुजसाठीं आसावली
कशी करूं तुज सावली
 माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥४॥

दाटे दोन्ही डोळां पाणी
आटे नयनांतच सुकुनी
कसें घालुं तुज आणुनी
 माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥५॥

प्रीतिवरी विश्वासून
घडीभरी सोसूं ऊन
नको टाकुं खालीं मान
    माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥६॥

मृगजळाच्या तरंगांत
नभाच्या निळ्या रंगांत
चल रंगूं सारंगांत
    माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥७॥

# बहु असोत सुंदर संपन्न की महा

**श्री. कृ. कोल्हटकर**

बहु असोत सुंदर संपन्न की महा
    प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ।।धृ.।।

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशय—नदांविणें?
    पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा ।।१।।

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
    शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा ।।२।।

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
    यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ।।३।।

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥४॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ॥५॥

## जाईन विचारित रानफुला

### शांता ज. शेळके

जाईन विचारित रानफुला
भेटेल तिथें ग, सजण मला ! ॥ धृ.॥

भग्न शिवालय परिसर निर्जन
पळसतरूंचें दाट पुढें बन
तरुवेली करतिल गर्द झुला ! ॥१॥

उंच पुकारिल मोर काननीं
निळ्या ढगांतुन भरेल पाणी
लहरेल विजेची सोनसळा ! ॥२॥

वाहत येइल पूर अनावर
बुडतिल वाटा आणि जुनें घर
जाईल बुडुन हा प्राण खुळा ! ॥३॥

## या झोपल्या जगांत

### राम मोरे

या झोपल्या जगांत
नाहीं कुणीच जागें
बिलगूनियां धरेला
आकाश गूज सांगे ॥धृ.॥
माळून हार डोईं
रानांतल्या फुलांचा
ल्याली वसुंधरा ही
अभिसार चांदण्याचा
मधुवंतिचा सुवास
वाऱ्यावरी तरंगे ॥१॥
स्वप्नील लोचनांत
झुकतां हळूच चांद
देहांतुनी सुरेख
घुमला मधूर नाद
निःशब्द रात्र जाई
गुंफीत प्रीतिधागे ॥२॥
आली फुलून काया
कंपीत गात्र झालें
बेबंद बरसणारे
मन मेघ मेघ झालें
होतीं भल्या पहांटे
तीं एकरूप दोघें ॥३॥

# विसरशील खास मला

## ज. के. उपाध्ये

विसरशील खास मला दृष्टिआड होतां
वचनें हीं गोड गोड देशि जरी आतां ॥ धृ.

दृष्टिआड झाल्यावर सृष्टिही निराळी
व्यवसायहि विविध विविध विषय भोवतालीं
गुंततां तयांत कुठें वचन आठवीतां ? ॥१॥

स्वैर तूं विहंग अंबरांत विहरणारा
वशहि वशीकरण तुला सहज जादुगारा
लाभशील माझा मज केविं जसा होता ॥२॥

स्वत्वाचें भान जिथें गुंतल्या नुरावें
झुरणारें हृदय तिथें हें कुणी स्मरावें
होइल उपहास खास, आस धरूं जातां ॥३॥

अंतरिंची आग तुला जाणवूं कशानें
बोलवे न वेदनाच वचन दुःख नेणें
याकरतां दृष्टिआड होउं नको नाथा ॥४॥

# स्वरगंगेच्या काठावरतीं

**शंकर वैद्य**

गतजन्मींची खूण सापडे
ओळखलें का मला ?
स्वरगंगेच्या काठावरतीं
वचन दिलें तूं मला ॥धृ.॥

वदलिस तूं : मी सावित्री ती
शकुंतला मी, मी दमयंती
नांव भिन्न पण मी ती प्रीती
चैतन्याचा पूर तेधवां
गंगेला पातला ॥१॥

अफाट जगतीं जीव रजःकण
दुवे निखळतां कोठुन मीलन
जीव भुकेला हा तुजवांचुन
जन्मांमधुनी पिसाट फिरतां
भेट घडे आजला ॥२॥

## विजयपताका श्रीरामाची

### योगेश्वर अभ्यंकर

विजयपताका श्रीरामाची
झळकते अंबरीं
प्रभु आले मंदिरीं ॥ धृ.॥

गुलाल उधळुनि नगर रंगलें,
भक्तगणांचे थवे नाचले,
रामभक्तिचा गंध दरवळे,
गुढ्यातोरणें घरोघरीं ॥१॥

आला राजा अयोध्येचा,
सडा शिंपिला प्राजक्ताचा
सनई गाते मंजुळ गाणीं,
आरती ओवाळती नारी ॥२॥

श्रीरामाचा गजर होउनी,
पावन त्रिभुवन झुकतें चरणीं
भक्त रंगले गुणी गायनीं
भक्तियुगाची ललकारी ॥३॥

## माझी बेगम आली

**बा. भ. बोरकर**

माझी बेगम आली, प्यारी
माझी बेगम आली ॥ धृ.॥

मस्त मोंगली विलास सगळे
उधळित ही भंवतालीं
डोळ्यांतुनि वाळ्याचें अत्तर
हांसत हांसत जाळी ॥१॥

केश रेशमी, गाल मख्मली,
अधरिं शराबी लाली
वचनीं बुलबुल, गायनिं कोकिळ
कवनीं पिक कुरवाळी ॥२॥

न्हाली ही शृंगाररसानें
प्रतिभालंकृति ल्याली
सुमधुर स्वप्नें, दिव्य भविष्यें
फुलवित गालीं, भालीं ॥३॥

श्वासें जाळी धूप, कटाक्षें
उरांत खंजिर घाली
आणि तत्क्षणीं घाव चुंबुनी
होई रंगरसेली ॥४॥

हांसत, नाचत ये चंदेरी
माझी गझल-कवाली
अन् रक्ताची मैफल उडवी
हृदयीं, रंगमहालीं. ॥५॥

## गोकुळिंचा राजा माझा

**ग. दि. माडगूळकर**

गोकुळिंचा राजा, माझा
गोकुळिंचा राजा ॥ धृ.॥

देवकिनंदन श्याम सुलोचन
गोपगड्यांसह खेळे हांसुन
लेवुनि पानफुलांच्या साजा ॥१॥

वाम बाहुवर कपोल डावा
अधरिं आडवा धरितो पावा
मोहन कुंजविहारी माझा ॥२॥

यमुनातीरीं उभ्या गौळणी
रूप घेति तें नयनीं भरुनी
सोडुनि जलभरणाच्या काजां ॥३॥

## आई, बघ ना कसा हा दादा ?

**शांता ज. शेळके**

आई, बघ ना कसा हा दादा ?
मला चिडवायचं हाच याचा धंदा ! ॥ धृ.॥

लग्न बाहुलीचं लावतां आम्ही
म्हणतो, "नवरदेव आहें मी
आतां मलाच मुंडावळि बांधा ! " ॥१॥

कधीं मोठेमोठे करतो डोळे
कधीं उगाच विदुषकि चाळे
भारी खट्याळ, नाहिं मुळिं साधा ! ॥२॥

दादा भलताच द्वाड आहे आई !
खोड्या करून छळतो बाई
याला ओवाळायचि नाहिं मी यंदा ! ॥३॥

# दूर आर्त सांग कुणीं

**मंगेश पाडगावकर**

दूर आर्त सांग कुणीं छेडिली असावरी
पारिजातकुसुमें हीं उधळिलीं मनावरी ।।धृ.।।

एकाकीपण सरलें
मी माझी नच उरलें
भान असें हरलें अन् मी झालें बावरी ।।१।।

यमुनेचें हें पाणी
चकित होय मजवाणी
कानांनीं प्राणांनीं प्राशियली माधुरी ।।२।।

कुठुनी हे येति सूर ?
लावितात मज हुरहुर
फडफडतो तडफडतो प्राणविहग पंजरीं ।।३।।

मी मजला विसरावें
बुडुनि सुरांतच जावें
बांसरी न दूर सखे, ती माझ्या अंतरीं ।।४।।

## वृंदावनांत माझ्या

### शांताराम नांदगावकर

वृंदावनांत माझ्या ही तुळस डोलते
मी प्रीतभावभोळी पतिदेव पूजितें ॥ धृ.॥

घरकूल सानुलेंसें या दोन जीवितांचें
येथें सुखांत नांदे हें राज्य वैभवाचें
सखयास मी मनाचें हें फूल वाहतें ॥१॥

रघुनंद श्याम विष्णू त्यांच्यांत मी पहातें
सानंद प्रीतिगंगा त्यांच्या हृदीं वहातें
तृप्ती मनोरथांची त्यांच्यांत राहते ॥२॥

गत जन्मिच्या तपाचें हें पुण्य ये फळाला
या एक भाबडीला राजा गुणी मिळाला
दोघांस ईश्वराशीं मी सौख्य मागतें ॥३॥

## बोल सखया मधुबोल रे

### स. अ. शुक्ल

बोल सख्या मधु बोल रे,
धरुं नको अबोला ।।धृ.।।

तव मुरलीचा बोल घुमला
विमल हृदयिं बघ खोल रे ॥१॥

बावरि राधा, विकल मनाचा
सावरिं सुटला तोल रे ॥२॥

वाजिव सखया, एकदां बांसरी
घेइ जिवाचें मोल रे ॥३॥

विश्व उमललें, जीवन फुललें
फुले जादु अनमोल रे ॥४॥

हंसति अनंत नभांतरिं तारे
नाचति किति ग्रह-गोल रे ॥५॥

जिवलगा कन्हैया,
बोल गडे मधु बोल रे ॥६॥

# डोळे तुझे बदामी

## बा. भ. बोरकर

डोळे तुझे बदामी, देती मला सलामी
त्यानेंच हा असा मी, झालों गडे निकामी ॥१॥

लागे न चित्त धामीं, लागे न चित्त कामीं
मोठे लबाड लुच्चे, डोळे तुझे बदामी ॥२॥

जख्मी करून जीवा, हंसती वरून नामी
भरितात मीठ ऐसें, डोळे तुझे बदामी ॥३॥

बोली मिठास त्यांची, कावा तरी गनीमी
भुलवून मारणारे, डोळे तुझे बदामी ॥४॥

होती क्षणांत भोळे, होती क्षणीं वहीमी
छळिती परोपरींनीं, डोळे तुझे बदामी ॥५॥

जरि हाल चालती हे, दे नित्य ही गुलामी
सुल्तान मोंगली हे, डोळे तुझे बदामी ॥६॥

मी धुंद मोर कामी, फुलवून रोमरोमीं
हे नाटकी इमानी, डोळे तुझे बदामी ॥७॥

# ये रे घना, ये रे घना

## आरती प्रभू

ये रे घना, ये रे घना
न्हाउं घाल माझ्या मना ।।धृ.।।

फुलें माझि अळुमाळू
वारा बघे चुरगळूं
नको नको म्हणतांना
गंध गेला रानावना ।।१।।

टाकुनियां घरदार
नाचणार नाचणार
नको नको म्हणतांना
मनमोर भर राना ।।२।।

नको नको किती म्हणूं
वाजणार दूर वेणू
बोलावतो सोसाट्याचा
वारा मला रसपाना ।।३।।

# जा सांग लक्ष्मणा

## वसंत बापट

जा सांग लक्ष्मणा, सांग रामरायाला
"समजला" म्हणावें, "न्याय तुझा सीतेला ॥ धृ.॥

अग्नींत घेतली उडी उजळली कुडी
पटविलें जेव्हां, होतास तिथें तू तेव्हां
केलास न्याय परि उलटा, ठरलें कुलटा
केलीस सफळ मम सेवा
शोभलें तुझ्या वंशास, दिगंत यशास
चढेल तजेला" ॥१॥

जा सांग "जानकी अजुनी राहि जिवंत
तो रघुवंशाचा अंश तिच्या उदरांत
तोवरी प्राण कोंडील देहकोषांत
राणिची भिकारिण आज, होय रघुराज
तिला सांभाळा" ॥२॥

# प्रेमस्वरूप आई

## माधव जूलियन

प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई !
बोलावुं तूज आतां मी कोणत्या उपायीं ? ॥१॥

तूं माय, लेकरूं मी, तूं गाय, वासरूं मी,
ताटातुटी जहाली आतां कसें करूं मी ? ॥२॥

गेली दुरी यशोदा टाकूनि येथ कान्हा,
अन् राहिला कधींचा तान्हा तिचा भुका ना ? ॥३॥

तान्ह्यास दूर ठेवी - पान्हा तरीहि वाहे -
जाया सती शिरे जी आगींत, शांत राहे, ॥४॥

नैष्ठुर्य त्या सतीचें तूं दाविलेंस माते,
अक्षय्य हृत्प्रभूचें सामीप्य साधण्यातें. ॥५॥

नाही जगांत झाली आबाळ या जिवाची,
तूझी उणीव चित्तीं आई, तरीहि जाची. ॥६॥

चित्तीं तुझी स्मरेना कांहींच रूपरेखा,
आई हवी म्हणूनी सोडी न जीव हेका. ॥७॥

विद्याधनप्रतिष्ठाः लाभे अतां मला ही
आईविणें परी मी हा पोरकाच राहीं. ॥८॥

सारें मिळे परंतू आई पुन्हां न भेटे,
तेणें चिताच चित्तीं माझ्या अखंड पेटे. ॥९॥

आई, तुझ्या वियोगें ब्रह्मांड आठवे गे
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगें ॥१०॥

किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोतीं
अव्यक्त अश्रुधारा कीं तीर्थरूप ओती ॥११॥

ही भूक पोरक्याची होई न शांत आई
पाहूनियां दुज्याचें वात्सल्य लोचनांही ॥१२॥

वाटे इथूनि जावें, तूझ्यापुढें निजावें
नेत्रीं तुझ्या हंसावें, चित्तीं तुझ्या ठसावें ॥१३॥

वक्षीं तुझ्या परी हें केव्हां स्थिरेल डोकें,
देईल शांतवाया हृत्स्पंद मंद झोकें ॥१४॥

घे जन्म तूं फिरूनी, येईन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी ! ॥१५॥

# अरे संसार संसार

## बहिणाबाई चौधरी

अरे संसार संसार
  जसा तवा चुल्ह्यावर
आधीं हाताले चटके
  तव्हां मियते भाकर ! ॥१॥

अरे संसार संसार
  खोटा कधीं म्हनूं नहीं
राउळाच्या कयसाले
  लोटा कधीं म्हनूं नहीं ॥२॥

अरे, संसार संसार
  नहीं रडनं कुढनं
येड्या, गयांतला हार
  म्हनूं नको रे लोढनं ! ॥३॥

अरे, संसार संसार
  खीरा येलावरचा तोड
एक तोंडामधीं कडू
  बाकी अवघा लागे गोड ॥४॥

अरे, संसार संसार
  म्हनूं नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
  मधीं गोडंब्याचा ठेवा ॥५॥

आई, तुझ्या वियोगें ब्रह्मांड आठवे गे
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगें ॥१०॥

किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोतीं
अव्यक्त अश्रुधारा कीं तीर्थरूप ओती ॥११॥

ही भूक पोरक्याची होई न शांत आई
पाहूनियां दुज्याचें वात्सल्य लोचनांहीं ॥१२॥

वाटे इथूनि जावें, तूझ्यापुढें निजावें
नेत्रीं तुझ्या हंसावें, चित्तीं तुझ्या ठसावें ॥१३॥

वक्षीं तुझ्या परी हें केव्हां स्थिरेल डोकें,
देईल शांतवाया हृत्स्पंद मंद झोकें ॥१४॥

घे जन्म तूं फिरूनी, येईन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी ! ॥१५॥

# अरे संसार संसार

**बहिणाबाई चौधरी**

अरे संसार संसार
   जसा तवा चुल्ह्यावर
आधीं हाताले चटके
   तव्हां मियते भाकर ! ॥१॥

अरे संसार संसार
   खोटा कधीं म्हनूं नहीं
राउळाच्या कयसाले
   लोटा कधीं म्हनूं नहीं ॥२॥

अरे, संसार संसार
   नहीं रडनं कुढनं
येड्या, गयांतला हार
   म्हनूं नको रे लोढनं ! ॥३॥

अरे, संसार संसार
   खीरा येलावरचा तोड
एक तोंडामधीं कडू
   बाकी अवघा लागे गोड ॥४॥

अरे, संसार संसार
   म्हनूं नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
   मधीं गोडंब्याचा ठेवा ॥५॥

देखा संसार संसार
   शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
   मधीं चिक्ने सागरगोटे ॥६॥

ऐका, संसार संसार
   दोन्ही जीवांचा इचार
देतो दुःखाले होकार
   अन सुखाले नकार ॥७॥

देखा, संसार संसार
   दोन्ही जीवांचा सुधार
कधीं नगद उधार
   सुखादुःखाचा बेपार ! ॥८॥

अरे, संसार संसार
   असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
   त्याच्यावरतीं मदार ॥९॥

असा संसार संसार
   आधीं देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
   मग जीवाचा आधार ! ॥१०॥

## माझें गाणें

### बालकवि

२६२८ ८/५/६९

माझें गाणें, एकच माझें नित्याचें गाणें,
अक्षय गाणें, अभंग गाणें, गाणें हें गाणें, ॥१॥

सर्व जगाचें मंगल, मंगल हें माझें गाणें,
या विश्वाची एकतानता हें माझें गाणें ॥२॥

आशेच्या वीणेचा चढवुनि सूर भौतिकांत
हें गाणें, हें प्रियकर माझें गाणें मी गात. ॥३॥

ही प्रेमाची, ही शांतीची, विश्वमंगलाची,
सौभाग्याची तार तशी ही, ही जगदैक्याची. ॥४॥

"निरध्वनी हें, मूकगान हें" यास म्हणो कोणी,
नभांत हें सांठवलें यानें दुमदुमली अवनी. ॥५॥

सर्व धर्म हे, भेद-पंथही सर्व एक झाले,
माझें, माझें विश्व, तार ही प्रेमाची बोले. ॥६॥

शांत(हि) मत्सर, प्रशांत कपटस्वार्थाची ज्वाला,
चिच्छांतीनें अहा भरीलें सगळ्या विश्वाला. ॥७॥

ही मोक्षाची, स्वातंत्र्याची, उन्नतिची माला,
सौभाग्याची तार लागलों मी छेडायाला. ॥८॥

हें नंदनवन ही स्वर्भूमी एक पहा झाली !
मंगल मंगल मद्गानाची गति ही शेवटली. ॥९॥

## परिशिष्ट १

### सहकार्याबद्दल या सुहृदांचे आभार मानायलाच हवेत :

करुणा देव, मुंबई-२५
श्री. आर्. टी. नारकर, मुंबई-२५
गुरूनाथ सामंत
प्रभा वि. हुंबे, मुंबई-६५
अशोक प. परब, ठाणे
स्नेहल प्र. कोरगांवकर, मुंबई-७८
रमेश गोटे
चिं. वा. आठल्ये, पुणे-२९
किशोर वा. श्रीवर्धनकर, मुंबई-७०
गोविंद भा कुळकर्णी, लातूर
स्मिता चं. देशपांडे, पुणे-२९
रमेश ज. गोरे, बदलापूर
काशिनाथ भारंबे, भुसावळ
प्राची पळसुले, मुंबई-२
दिगंबर म. साळगावकर, मुंबई-७८
श्री. रं. तांबे, औरंगाबाद
गिरीश बर्वे, मुंबई-६६.
आशा मोघे, पार्डी, (गुजरात)
म. वि. मुळे, चाळीसगांव
सु. ग. गोडबोले, कोलथरे (रत्नागिरी)
सीताराम बा. शेलटे, मुंबई-७४
रेखा रहाळकर, नवी दिल्ली
विद्याधर द. दांडेकर, पुणे-९
सुरेश जी. देशमुख, नाशिक रोड
मृणालिनी पुरंदरे, पुणे-३०
अशोक अ. जोशी, पुणे-२९
स्वाती मु. जोशी, मुंबई-३७

दिवाकर दुनाखे, पुणे-४०
सुरेखा मो. लिमये, मुंबई-६९
देवदत्त कांबळे, मुंबई -१४
मुग्धा बापट, मुंबई-७७
आशा ब. मुळे, डोंबिवली
वसंत पटवर्धन, मुंबई-६९
गोपाळ पां. गोरे, मुंबई-६६
हरी विनायक दाते, पुणे-९
एस्. जी अडके, सांगली
रा. व्यं. छत्रपती, सोलापूर
यशवंत लिमये, मुंबई-४
शाहीर चंदू भरडकर, मुंबई-४
स्नेहल सुबोध जोगळेकर, पुणे-२९
किरण सामंत, मुंबई
ज्ञानदेव खोबरेकर, मुंबई
रत्नाकर वाशीकर, मुंबई
विलास वि. फडके, पेण
तात्या पटवर्धन, पनवेल
शोभना चांदूरकर, नागपूर
सुलभा हेर्लेकर, नागपूर
संजीवन ज. मोघे, पुणे-३०
मंजिरी चुनेकर; ठाणे
विकास सुर्वे, मुंबई-८०
विनायक हरी मोडक, मुंबई-७१
नंदकिशोर ग. नेर्लेकर, मुंबई-७८
विजय पोतदार, मुंबई-८.
दया घोंगे, डोंबिवली

# परिशिष्ट २

**(एकच गाणे अनेकदा ध्वनिमुद्रित झाले असेल तेव्हा संगीतकार व गायक यांच्या मागे क्रमांक टाकले आहेत.)**

| गाणे | कवी | संगीतकार | गायक |
|---|---|---|---|
| १) तुझें गीत गाण्यासाठी | मंगेश पाडगावकर | यशवंत देव | सुधीर फडके |
| २) रानारानांत गेलि बाइ शीळ | ना. घ. देशपांडे | जी. एन्. जोशी | जी. एन्. जोशी |
| ३) नका गडे माझ्याकडे | ग. दि. माडगूळकर | गजानन वाटवे | गोविंद कुरवाळीकर |
| ४) गंगा जमुना डोळ्यांत.... | पी. सावळाराम | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ५) गर्जा जयजयकार, क्रांतिचा | कुसुमाग्रज | १. गजानन वाटवे<br>२. कन्हू घोष | १. गजानन वाटवे<br>२. आकाशवाणी कलावंत |
| ६) आज गोकुळांत रंग | सुरेश भट | हृदयनाथ मंगेशकर | लता मंगेशकर |
| ७) उंबरठ्यावर माप ठेविलें | मनमोहन नातू | गजानन वाटवे | सरोज वेलिंगकर |
| ८) दोन ध्रुवांवर दोघे आपण | मा. ग. पातकर | गजानन वाटवे | गजानन वाटवे |
| ९) तोच चंद्रमा नभांत | शांता ज. शेळके | सुधीर फडके | सुधीर फडके |
| १०) दत्तदिगंबर दैवत माझें | सुधांशु | आर्. एन्. पराडकर | आर्. एन्. पराडकर |
| ११) शांत सागरीं कशास | संजीवनी मराठे | जी. एन्. जोशी | कांचनमाला शिरोडकर |
| १२) तुज स्वप्नि पाहिलें रे | दत्ता डावजेकर | दत्ता डावजेकर | लता मंगेशकर |
| १३) ती वेळ मला स्मरते | यशवंत देव | यशवंत देव | उषा अत्रे |
| १४) मैत्रिणिनों, सांगू नका | मनमोहन नातू | गजानन वाटवे | सरोज वेलिंगकर |
| १५) डोळे हे जुलमि गडे | भा. रा. तांबे | १. केशवराव भोळे<br>२. जी. एन्. जोशी<br>३. वसंत प्रभू | १. केशवराव भोळे<br>२. जी. एन्. जोशी<br>३. आशा भोसले |
| १६) रुपेरी वाळूंत .... | शांताराम नांदगावकर | अनिल-अरुण | आशा भोसले |
| १७) निरांजन पडले तबकांत | बाबुराव गोखले | गजानन वाटवे | गजानन वाटवे |
| १८) बगळ्यांची माळ फुले | वा. रा. कांत | श्रीनिवास खळे | वसंतराव देशपांडे |
| १९) तू दूर दूर तेथें | मधुकर जोशी | यशवंत देव | आशा भोसले |
| २०) सावळ्या विठ्ठला | रा. ना. पवार | दशरथ पुजारी | सुमन कल्याणपूर |
| २१) ओटी भरा, ग, ओटी भरा | मा. ग. पातकर | गजानन वाटवे | मोहनतारा अजिंक्य |
| २२) नंदाघरीं नंदनवन फुललें | योगेश्वर अभ्यंकर | दशरथ पुजारी | सुमन कल्याणपूर |
| २३) पंढरिनाथा झडकरि आतां | पी. सावळाराम | वसंत प्रभू | आशा भोसले |
| २४) या कातरवेळीं | अनिल भारती | मधुकर पाठक | मालती पांडे |
| २५) ने मजसी ने परत मातृभूमीला | वि. दा. सावरकर | हृदयनाथ मंगेशकर | हृदयनाथ, लता मंगेशकर व भावंडे |
| २६) फार नको वाकूं | ना. घ. देशपांडे | जी. एन्. जोशी | जी. एन्. जोशी |
| २७) असेंच होतें म्हणायचें तर | विंदा करंदीकर | दत्ता डावजेकर | सुधीर फडके |

| | | | |
|---|---|---|---|
| २८) घाल घाल पिंगा वाऱ्या | कृ. ब. निकुंब | १. ए पी. नारायणगावकर<br>२. वसंत देसाई<br>३. कमलाकर भागवत | १. कालिंदी केसकर<br>२. फैयाज आणि मुले<br>३. सुमन कल्याणपूर |
| २९) पाहुनी रघुनंदन सांवळा | रमेश अणावकर | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ३०) त्या सांवळ्या तनूचें | आत्माराम सावंत | दशरथ पुजारी | माणिक वर्मा |
| ३१) चले जाव, चले जाव | केशवकुमार | | |
| ३२) सहज सख्या एकटाच | सूर्यकांत खांडेकर | श्रीनिवास खळे | आशा भोसले |
| ३३) अजून त्या झुडुपांच्या मागें | वसंत बापट | दशरथ पुजारी | दशरथ पुजारी |
| ३४) शुक्रतारा मंद वारा | मंगेश पाडगावकर | श्रीनिवास खळे | अरूण दाते, व<br>सुधा मल्होत्रा |
| ३५) निळा सांवळा नाथ | गंगाधर महांबरे | श्रीनिवास खळे | कुंदा बोकील |
| ३६) हरवलें तें गवसलें का ? | पी. सावळाराम | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ३७) ती पहा, ती पहा, बापुजींची_ | मनमोहन नातू | गजानन वाटवे | गजानन वाटवे |
| ३८) प्रतिमा उरीं धरोनी | द. वि. केसकर | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ३९) उषःकाल होतां होतां | सुरेश भट | हृदयनाथ मंगेशकर | हृदयनाथ मंगेशकर |
| ४०) उर्मिले, त्रिवार वंदन तुला | राजा मंगळवेढेकर | राम फाटक | राम फाटक |
| ४१) अशीच अमुची आई असती | मधुकर जोशी | दशरथ पुजारी | दशरथ पुजारी |
| ४२) पाऊस कधींचा पडतो | ग्रेस | यशवंत देव | |
| ४३) जीवाच्या जिवलगा | संजीवनी मराठे | यशवंत देव | मधुबाला झवेरी |
| ४४) केशवा, माधवा | रमेश अणावकर | दशरथ पुजारी | सुमन कल्याणपूर |
| ४५) इथेच आणी या बांधावर | सुधांशु | विठ्ठल शिंदें | माणिक वर्मा |
| ४६) डाव मांडून भांडून | ना. घ. देशपांडे | राम फाटक | सुधीर फडके |
| ४७) कधीं बहर, कधि शिशिर | मंगेश पाडगावकर | यशवंत देव | सुधीर फडके |
| ४८) बलसागर भारत होवो | सानेगुरुजी | वसंत देसाई | गायकवृंद |
| ४९) स्वप्नांतल्या कळ्यांनों | म. पां. भावे | अनिल-अरुण | आशा भोसले |
| ५०) परीकथेंतिल राजकुमारा | वंदना विटणकर | अनिल मोहिले | कृष्णा कल्ले |
| ५१) मालवून टाक दीप | सुरेश भट | हृदयनाथ मंगेशकर | लता मंगेशकर |
| ५२) जन पळभर म्हणतिल | भा. रा. तांबे | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ५३) श्रीरामाचे चरण धरावे | यशवंत देव | यशवंत देव | सुमन कल्याणपूर |
| ५४) धागा धागा अखंड विणुं या | पी. सावळाराम | वसंत प्रभू | आशा भोसले |
| ५५) होईल संक्रांत तेव्हां खरी | यतीश लोंढे | | |
| ५६) मी काय तुला वाहूं ? | कुसुमाग्रज | गजानन वाटवे | मालती पांडे |
| ५७) सखि, मंद झाल्या तारका | सुधीर मोघे | राम फाटक | १. भीमसेन जोशी<br>२. सुधीर फडके |
| ५८) उघड उघड दार, प्रियकरास | अनिल | १. जी. एन्. जोशी<br>२. जी. एन् जोशी | १. [illegible] ल.देशपांडे<br>२. जी. एन्. जोशी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५९) माझा पानमळा, पानमळा | वि. म. कुलकर्णी | गजानन वाटवे | गजानन वाटवे |
| ६०) प्रीती जडली तुझ्यावरी | शांता ज. शेळके | यशवंत देव | उषा वाघ |
| ६१) गळ्याची शपथ तुला | ग. ल. ठोकळ | सुधीर फडके | माणिक वर्मा |
| ६२) यमुनाकाठीं ताजमहाल | अनिल भारती | गजानन वाटवे | गजानन वाटवे |
| ६३) शोधिसी मानवा, राउळीं | वंदना विटणकर | श्रीकांत ठाकरे | महंमद रफी |
| ६४) आला खुशित समिंदर | अनंत काणेकर | केशवराव भोळे | ज्योत्स्ना भोळे |
| ६५) माती सांगे कुंभाराला | मधुकर जोशी | गोविंद पोवळे | गोविंद पोवळे |
| ६६) अजून नाहीं जागी राधा | इंदिरा संत | दशरथ पुजारी | सुमन कल्याणपूर |
| ६७) तुझें बघणें | विनायक राहतेकर | दत्ता डावजेकर | अपर्णा मयेकर |
| ६८) सांग पोरी सांग सारें | मनमोहन नातू | | बबनराव नावडीकर |
| ६९) नीज माझ्या नंदलाला | मंगेश पाडगावकर | श्रीनिवास खळे | लता मंगेशकर |
| ७०) आली कुठूनशी कानीं | सोपानदेव चौधरी | वसंत आजगावकर | वसंत आजगावकर |
| ७१) मीलनास आपुल्या, साक्ष | गंगाधर दांडेकर | प्रभाकर पंडित | स्नेहल भाटकर |
| ७२) घरांत हसरे तारे, असतां | द. वि. केसकर | वसंत प्रभू | लता मंगेशकर |
| ७३) आठवणी दाटतात | योगेश्वर अभ्यंकर | एम्. जी. गोखले | सुमती टिकेकर |
| ७४) तुझ्या कामामधून | वसंत बापट | वसंत बापट | |
| ७५) जांभुळपिकल्या झाडाखालीं | ना. धों. महानोर | हृदयनाथ मंगेशकर | लता मंगेशकर |
| ७६) जीवनांत ही घडी | यशवंत देव | यशवंत देव | लता मंगेशकर |
| ७७) पूर्वेच्या देवा | गंगाधर महांबरे | वीणा चिटको | रामदास कामत |
| ७८) आषाढाच्या सघन घनासम | प्रवीण दवणे | दीपक पाटेकर | देवकी पंडित |
| ७९) प्रेम कोणीही करीना | माधव जूलियन | जी. एन. जोशी | जी. एन. जोशी |
| ८०) दिसलीस तूं.. फुलले ऋतू | सुधीर मोघे | राम फाटक | सुधीर फडके |
| ८१) गोरी गोरीपान | ग. दि. माडगूळकर | श्रीनिवास खळे | आशा भोसले |
| ८२) कैवल्याच्या चांदण्याला | अशोकजी परांजपे | जितेंद्र अभिषेकी | जितेंद्र अभिषेकी |
| ८३) माझ्या प्रीतिच्या फुला | अनिल | यशवंत देव | उषा मंगेशकर |
| ८४) बहु असोत सुंदर संपन्न | श्री. कृ. कोल्हटकर | १. मालती अलूरकर | २. ज्योत्स्ना भोळे |
| | | जी पार्टी<br>शंकरराव व्यास, ललिता देऊळकर, (फडके) आणि व्ही.जी. भाटकर | |
| ८५) जाईन विचारित रानफुला | शांता ज. शेळके | हृदयनाथ मंगेशकर | किशोरी आमोणकर |
| ८६) या झोपल्या जगांत | राम मोरे | दशरथ पुजारी | सुमन कल्याणपूर |
| ८७) विसरशील खास मला | ज. के. उपाध्ये | यशवंत देव | आशा भोसले |
| ८८) स्वरगंगेच्या काठावरती | शंकर वैद्य | हृदयनाथ मंगेशकर | अरुण दाते |
| ८९) विजयपाताका श्रीरामाची | योगेश्वर अभ्यंकर | बाळ माटे | माणिक वर्मा |
| ९०) माझी बेगम आली | बा. भ. बोरकर | | पंडितराव नगरकर |
| ९१) गोकुळिचा राजा माझा | ग. दि. माडगूळकर | सुधीर फडके | माणिक वर्मा |

| | | | |
|---|---|---|---|
| ९२) आई, बघ ना कसा | शांता ज. शेळके | सी. रामचंद्र | सुषमा श्रेष्ठ |
| ९३) दूर आर्त सांग कुणी | मंगेश पाडगावकर | यशवंत देव | मधुबाला झवेरी |
| ९४) वृंदावनांत माझ्या | शांताराम नांदगावकर | प्रभाकर जोग | माणिक वर्मा |
| ९५) बोल सख्या मधुबोल रे | स. अ. शुक्ल | | संजीवनी मराठे |
| ९६) डोळे तुझे बदामी | बा. भ. बोरकर | | पंडितराव नगरकर |
| ९७) ये रे घना ये रे घना | आरती प्रभू | हृदयनाथ मंगेशकर | आशा भोसले |
| ९८) जा सांग लक्ष्मणा, सांग | वसंत बापट | जी. एन. जोशी | गीता रॉय-दत्त |
| ९९) प्रेमस्वरूप आई | माधव जूलियन | जी. एन. जोशी | १. गजानन वाटवे |
| | | २. दत्ता डावजेकर | २. लता मंगेशकर |
| | | ३. वसंत प्रभू | ३. लता मंगेशकर |
| १००) अरे संसार संसार | बहिणाबाई चौधरी | वसंत पवार | सुमन कल्याणपूर |
| १०१) माझें गाणें | बालकवी | हृदयनाथ मंगेशकर | लता मंगेशकर |

## परिशिष्ट क्र. ३

४२) **पाऊस कधीचा पडतो** :(अजून या गाण्याची ध्वनिमुद्रिका झालेली नाही) कविता ग्रेस यांची. चाल श्री.यशवंत देव यांची आहे.प्रथम ध्वनिक्षेपण, मासिक गीतांच्या कार्यक्रमात नागपूर आकाशवाणी केन्द्रावरून झाले. गायिका : प्रमोदिनी क्षत्रिय

६१) **यमुनाकाठीं ताजमहाल** : अनिल भारतींच्या या गाण्यात तिसऱ्या कडव्यात पाठभेद आहेत. कडव्यातील पहिल्या दोन ओळी सारख्याच आहेत पण त्यानंतर असे आहे-दिव्य दृष्टिला होइल तुमच्या मंगल साक्षात्कार ॥३॥

९५) **बोल सख्या मधुबोल रे** : स. अ. शुक्ल यांचे हे गाणे संजीवनी मराठे यांनी गायले आहे. 'घुंगट का पट खोल रे' या ज्यूतिका रे यांनी गायलेल्या हिंदी गाण्याच्या चालीवरून ही चाल बांधली आहे संगीतकारांचे नाव कळू शकले नाही.

प्रा. द. वि. केसकर : 'प्रतिमा उरीं धरोनीं', 'घरात हसरे तारे असता' ही प्रसिद्ध गाणी लिहिणारे कवी. सध्या ते वाईला असतात. पूर्वीच्या काही पुस्तकात प्रा. द. वि. केसरकर असे नांव चुकीने प्रसिद्ध झाले होते.

**नम्र सूचना** : जेथे परिशिष्टात संगीतकार व गायकांची नावे दिलेली नाहीत तेथे निश्चित माहिती कळू शकलेली नाही. अन्य नोंदीत काही चूक असेल तर रसिकांनी कळवावे.

REFBK-0026287
REFBK-0026287